# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### ग्रामपंचायतीची १४ व्या वित्त आयोगाच्या निधीवरील व्याजाची रक्कम अन्यायकारक सक्तीने वसूल करीत असल्याबाबत

**(१) ३९७९ (१७-०७-२०२०) श्री.सदाशिव खोत, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायती सातत्याने कोरोनाविरुध्द लढाई करीत असताना ग्रामपंचायत फंडातून लागेल अशा पध्दतीने गाव निर्जंतुकीकरण करणे, कोरोनाबाबत जनजागृती व सर्वे करण्याच्या कामासाठी आशा स्वयंसेविका यांना मानधन देणे, गावामध्ये कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी संचारबंदीचे काटेकोरपणे पालन करणे यासाठी होमगार्ड पोलीस मित्र यांची नेमणूक करून त्यांना मानधन देणे, संस्थात्मक विलगीकरण कक्षाचा संपूर्ण १४ दिवसांचा खर्च ग्रामपंचायतीने केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास खात्याने दिनांक २८ मे, २०२० रोजी एका पत्राव्दारे (शासन निर्णय नाही) covid-१९ मध्ये आर्सेनिक एल्बम-३० ह्या औषध खरेदी कामे सर्व ग्रामपंचायत मधील १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजाची रक्कम शासनाकडे वर्ग करण्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू लॉकडाऊनच्या संचार बंदीमुळे ग्रामपंचायतींना कर्मचाऱ्यांचा वेतन देणे, पाणीपुरवठा वीज देयक भरणे कठीण झाले असताना विकास कामांना अजिबात निधी नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामपंचायतीच्या १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजाची रक्कम अन्यायकारक वसूल करण्याच्या शासनाच्या आदेशामुळे राज्यातील सर्व ग्रामपंचायती बंद करण्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू ग्रामपंचायतीवरील १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजाच्या रक्कमेची वसुली थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे, परंतु ग्रामपंचायत स्तरावर सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी /मिनी अंगणवाडी कार्यकर्त्या व अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्त्या तसेच अर्धवेळ स्त्री परिचर व आशा गट प्रवर्तक यांच्यामार्फत लोकांमध्ये जनजागृती, स्वच्छता मोहिम राबविणे, आरोग्याची काळजी घेणे इत्यादी कामे करण्यात आली. त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या नियमित वेतन/मानधन व्यतिरिक्त त्यांना रुपये १०००/- इतकी प्रोत्साहनपर रक्कम दिनांक ३०/०६/२०२० पर्यंत अदा करण्याबाबत दिनांक ३१/०३/२०२० रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

तत्कालीन कोरोनाची आपत्तीजनक परिस्थिती विचारात घेऊन नागरिकांची रोग प्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी अर्सेनिक अल्बम-३० आणि संशमनीवटी या औषधींचे ग्रामीण भागामध्ये जलद गतीने वाटप व्हावे तसेच खरेदी प्रक्रीयेमध्ये समन्वय साधता यावा यासाठी केंद्रीकृत दृष्टीकोन समोर ठेवून अर्सेनिक एल्बम-३० या औषध खरेदीसाठी ग्रामपंचायत मधील १४ व्या वित्त आयोगाच्या व्याजाची रक्कम शासनाकडे वर्ग करण्याचे कळविले आहे.
(३) हे, खरे नाही, ग्रामपंचायतींकडे १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा अखर्चित निधी तसेच १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधी असल्याकारणाने विकास कामांना अजिबात निधी नाही असे म्हणने योग्य नाही.

(४) हे, खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जमा झालेल्या सदर निधीतून अर्सेनिक अल्बम-३० खरेदी, रूग्णवाहिका खरेदी तसेच / कर्तव्य बजावताना कोविड-१९ संसर्ग आजारामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसास प्रत्येकी रुपये ५०.०० लाखाचे विमा कवच लागू करणे इत्यादी कामे शासनस्तरावरून करण्यात आली आहेत.

---

## सेलू (जि.परभणी) येथील बाजार समितीच्या गैरव्यवहाराबाबत

**(२) ५१०४ (१४-१२-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) येथील बाजार समितीचे संचालक मंडळ व इतरांनी विविध नियमांचे उल्लंघन केल्यामुळे चौकशी प्रकरणी त्रिस्तरीय चौकशी समिती नेमण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित संचालक मंडळाने केलेल्या विविध गैरप्रकार प्रकरणी जिल्हा उपनिबंधक, परभणी यांनी नोटीस जारी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित संचालक मंडळाविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१२-१०-२०२१) :** (१) होय.

श्री.विजय भांबळे, माजी विधानसभा सदस्य, जिंतूर (परभणी) यांचे निवेदन व श्री.ज्ञानेश्वर ताठे यांचा तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सहायक निबंधक, सहकारी संस्था, सेलू यांच्या आदेशान्वये चौकशी करण्याकरीता त्रिसदस्यीय पथक नियुक्ती केलेले होती.

(२) होय.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी कार्यालयाने दिनांक ०१/०९/२०२० अन्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४५ (१) अन्वये कृषी उत्पन्न बाजार समिती, सेलू च्या विद्‌यमान संचालक मंडळास कारणे दाखवा नोटीस तामील करण्यात आलेली आहे.

(३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्या दिनांक ०१/०९/२०२० च्या कारणे दाखवा नोटीसीच्या अनुषंगाने संचालक मंडळास त्यांचे म्हणणे मांडणेसाठी योग्य संधी देवून दिनांक १९/०१/२०२१ च्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्या आदेशान्वये संचालक मंडळ दोषी आढळल्याने संचालक मंडळ निष्प्रभावित करून त्याजागी शासकीय प्रशासकाची नेमणूक करण्यात होती. शासनाच्या दिनांक २८/०५/२०२१ रोजीच्या आदेशान्वये तेथे अशासकीय प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील महावितरणाच्या कार्यालयात निर्माण झालेल्या अपघाती स्थितीबाबत

**(३) ७९१७ (१५-०३-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील महावितरणाच्या कार्यालयात जागोजागी उघड्या वायर्स, लटकणारे स्वीच बोर्ड व टयूबलाईट, तुटलेल्या स्वीच बोर्डमधून बाहेर आलेल्या वायर्स अशी अपघाती परिस्थिती निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद येथील महावितरण कार्यालय सुस्थितीत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांसह ग्राहकांची सुरक्षा धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करुन महावितरण कार्यालयातील अपघाती स्थितीत सुधारणा होण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०५-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महावितरणचे विद्युत सुरक्षा अधिकारी यांचेमार्फत महावितरण कार्यालयाचे निरीक्षण करण्यात आले असून वायर फिटिंगचे व देखभाल दुरुस्तीची सगळी कामे करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील जंगलात पेटणाऱ्या वणव्यांबाबत

**(४) ८४३२ (११-०६-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) उपविभागांतर्गत माहे जानेवारी ते एप्रिल, २०२१ मध्ये सुमारे १०३ ठिकाणी वणवे पेटल्यामुळे २४८.४०० हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून सन २०२०-२१ मध्ये रायगड जिल्ह्यात १५३ ठिकाणी वणवे पेटल्यामुळे जंगलामधील वन संपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून जैवविविधता धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे वणव्यांवर नियंत्रण ठेवणे वन विभागास शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वन विभागातील रिक्त पदे भरुन जंगलात पेटणाऱ्या वणव्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (११-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अलिबाग (जि.रायगड) उपविभागांतर्गत माहे जानेवारी, २०२१ ते एप्रिल, २०२१ या कालावधीत अलिबाग उपविभागात १०१ वनव्याच्या घटना घडल्या असून २२५.१९ हे. वनक्षेत्रावर वणवा लागल्याचे निर्दशनास आले आहे. वणव्यामुळे झालेली नुकसानी रुपये १८३५०/- इतकी आहे.

रायगड जिल्हयात अलिबाग व रोहा हे वनविभाग येतात अलिबाग वन विभागात सन २०२०-२१ मध्ये ३५५ ठिकाणी वनवणवा लागल्याचे नोंद आहे. तसेच रोहा वन विभागात सन २०२०-२१ मध्ये २१४ ठिकाणी वनवणवे लागल्याचे नोंद आहे. अशाप्रकारे रायगड जिल्हयात सन २०२०-२१ मध्ये एकूण ५९६ वणव्याच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

सदर जळीत क्षेत्रात प्रामुख्याने वनांतील वाळलेले गवत तसेच झाडाखालील सुकलेला पाला-पाचोळा जळलेला आहे. सदर आग मुख्यत: ग्राऊंड फायर या स्वरुपाची असून त्यामुळे मोठ्या वाढलेल्या झाडांना धोका पोहचत नाही. तसेच जैवविविधता धोक्यात आलेच्या निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

अलिबाग वन विभागात मनुष्यबळ उपलब्ध असून, उपलब्ध मनुष्यबळाच्या मदतीने वणव्यावर नियंत्रण ठेवण्यात येते.

(३) शासनाकडून प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन वन विभागातील क्षेत्रिय रिक्त पदे भरण्यात येतात. वन क्षेत्रास आग लागू नये याकरीता जाळरेषा घेणे, फायर वॉचरची नियुक्ती करणे, आग विझवण्यासाठी फायर ब्लोअर या यंत्राचा वापर करणे तसेच जास्तीत जास्त फिरती करण्याकामी गस्त पथकातील कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येते. तसेच संवेदनशील क्षेत्रात आगीच्या हंगामामध्ये आवश्यकतेनुसार आगरक्षकांची नेमणुक करण्यात येवून स्थानिक मनुष्यबळाच्या मदतीने वणव्यावर नियंत्रण ठेवण्यात येते. वणवा नियंत्रणात आणण्यासाठी वनांस लागुन असलेल्या गावात संयुक्त वन समित्या देखील स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच विभागीय कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करुन त्यांचे मदतीने वनवणव्याचे संनियंत्रण करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील कोढ़ाळी-नागपूर मार्गावरील इंडस पेपर मिल मध्ये आग लागल्याबाबत

**(५) ८४६९ (०९-०६-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-अमरावती मार्गावरील सातनवरी (ता.नागपूर ग्रामीण, जि.नागपूर) येथील इंडस पेपर मिलला माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आग लागल्याची घटना घडली आहे, हे खरे अहो काय,

(२) असल्यास, इंडस पेपर मिलचे फायर ऑडिट देखील करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही बहुतांश पेपर मिलमध्ये सुरक्षेच्यादृष्टीने सुयोग्य अग्निशमन यंत्रणा न बसविता जुन्या पध्दती अंमलात आणून नियमांचे उल्लंघन केले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१३-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

इंडस पेपर मिल (नवीन नाव-ओरीगामी सेल्यूलोस प्रा.लि.) मौजा खेरी, अमरावती रोड, जि.नागपूर या कारखान्यात दिनांक ०३/०५/२०२१ रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास कारखान्याच्या परिसरामधील गोडाऊनमध्ये साठवणूक केलेल्या वेस्ट पेपरला (कच्चा माल) आग लागली.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये इमारतींच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे लेखापरीक्षण करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. परंतु, सदर कारखान्यामध्ये विविध अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांची पुर्तता करण्यात आली असल्याचे संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी कळविले आहे.

(४) सदर अपघाताची उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

कारखान्यात वेस्ट पेपर पासून टिश्यू पेपर, टॉयलेट पेपर रोलचे उत्पादन केले जात असून कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया कोव्हीड-१९ मुळे बंद होती. दिनांक ०३/०५/२०२१ रोजी कारखान्याच्या परिसरातील गोडाऊन मध्ये साठवणूक केलेल्या वेस्ट पेपर (कच्चा माल) वर बाहेरच्या परिसरातून वादळीवाऱ्यामुळे ठिणगी पडल्याने आग लागली. हवेमुळे आग इतरत्र गोडाऊनमध्ये पसरली. सदर आगीत कुणीही कामगार जखमी झालेला नाही.

महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा) नियम, २०१४ नुसार एखाद्या कारखान्यात २५० पेक्षा जास्त कामगार काम करीत असतील तर, त्या कारखान्याचे वर्षातून एकदा अंतर्गत सुरक्षा लेखा परिक्षण (Internal Safety Audit) कारखान्याच्या तज्ञ व्यक्तींकडून आणि कारखान्याचे बाहय सुरक्षा लेखा परिक्षण (External Safety Audit) दोन वर्षातून एकदा शासनमान्य सुरक्षा लेखा परिक्षकाद्वारे करणे आवश्यक आहे.

सदर कारखाना व्यवस्थापनाने कारखान्याचे सुरक्षा लेखा परिक्षण न केल्यामुळे महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा) नियम, २०१४ च्या नियमभंगाबाबत भोगवटादाराविरूध्द मा.अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांच्या न्यायालयात खटला दाखल करण्यात आला अूसन कारखान्यास सुरक्षेच्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिडकोच्या स्वस्त घर सोडतीतील लाभार्थ्यांना घरांचा ताबा मिळाला नसल्याबाबत

**(६) ८४८९ (११-०६-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.नरेंद्र दराडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने स्वस्त घरांचे स्वप्न दाखवून सन २०१८ मध्ये काढलेल्या १४,८०० सोडतीपैकी ६००० लाभार्थी उचित कागदपत्रांअभावी बाद झाले असून उर्वरित ८८०० लाभार्थ्यांना घरे देण्याबाबत सुरू असलेल्या प्रक्रियेअंती सिडकोमार्फत माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लाभार्थ्यांना घरांचा ताबा देण्याचे नियोजन होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरांचे काम पूर्ण न झाल्याने सिडकोला दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली असून माहे मार्च, २०२० मध्ये कोरोना साथीचे संकट ओढवल्यामुळे टाळेबंदी लागू होवूनही सिडकोने आखलेल्या वेळापत्रकानुसार लाभार्थ्यांकडून हप्ते वसुली सुरूच ठेवले व प्रसंगी दंड आकारुन सिडकोने वसुली केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त लाभार्थ्यांपैकी काही जणांनी टाळेबंदी काळातही बँकेकडून कर्ज काढून, दागदागिने विकून तसेच उसनवारीने पैसे घेवून सिडकोचे हप्ते भरले असून सुमारे ५००० लाभार्थी असे आहेत की ज्यांनी सिडकोचे संपूर्ण हप्ते भरले असतानाही सदर लाभार्थ्यांना घराचा हप्ता तसेच राहत्या घराचे भाडे या दुहेरी आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असल्याने त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी लाभार्थ्यांनी सिडकोकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्राहकांच्या अडचणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सिडकोमार्फत लाभार्थ्यांना घराचा ताबा लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२१) :** (१), (२) व (३) सिडको महामंडळामार्फत २०१८-१९ या कालावधीत एकूण १४८३८ सदनिकांची सोडत सोडण्यात आली. सदर सोडतीमधील सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी असून नवी मुंबईतील तळोजा, खारघर, कळंबोली, घणसोली, द्रोणागिरी या ५ नोडमध्ये गृहनिर्माण योजना सादर होत आहे. योजनेंतर्गत घरांचा ताबा ऑक्टो-२० पासून टप्याटप्याने देण्याचे प्रस्तावित होते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सदनिकेच्या भरावयाच्या ५ व्या व ६ व्या हप्त्यांवरील (२५ मार्च, २०२० ते ३१ जुलै, २०२१ कालावधीसाठी) विलंब शुल्क लाभार्थ्यांना माफ करण्यात आले आहे. तसेच ज्या लाभार्थ्यांना यापूर्वीच विलंब शुल्काचा भरणा केला आहे त्यांना त्याचा परतावा परत करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाचे काम सुरु असून या योजनेतील घरांचा ताबा लाभार्थ्यांना जुलै-२०२१ पासून देण्याचे सिडकोमार्फत प्रस्तावित आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चारकोप (कांदिवली) येथील तिवरांच्या जंगलाला आगी लागण्याचे प्रकार वाढल्याबाबत

**(७) ८५७६ (१८-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप (कांदिवली) सेक्टर ८ येथील सुमारे १३६ हेक्टर जागेवर वसलेल्या तिवरांचे जंगलाला आगी लागण्याचे प्रकार वाढल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात काही झोपड्या असून तेथील नागरिक तिवरांच्या जंगलाला आग लावून जंगलाची जागा बळकावण्याचा प्रयत्न करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरात सन २०१८ मध्ये एकूण आगीच्या १८ घटना घडल्या असून सन २०१९ मध्ये १४ आणि सन २०२० मध्ये ११ आगीच्या घटना घडल्या असून सातत्याने आगी लावण्याचे प्रकार घडत असल्याने तिवरांच्या जंगलाचे मोठ्या प्रमाणत नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

शासनाव्दारे अधिसूचित राखीव कांदळवनामधील चारकोप सेक्टर ८ मध्ये माहे मार्च, २०२१ मध्ये आगी लागण्याचे प्रकार आढळले नाहीत.

(३) व (४) मौजे चारकोप येथील सर्व्हे नं. ३९ मधील कांदळवनालगत जमा प्लास्टिक कचऱ्याला आग लागल्याचे दिनांक २९/११/२०२० रोजी दिसून आले.

तसेच मौजे कांदिवली येथील सर्व्हे नं. १४९ न.भु.क्र. १/ब मधील अधिसूचित राखीव कांदळवन क्षेत्रालगत रस्त्याच्या बाजुला असलेला प्लास्टिक व इतर कचरा जाळल्याने कांदळवनाच्या काही झाडांना झळ लागल्याचे दिसून आल्याने दिनांक २८/१०/२०१८ व दिनांक १२/०२/२०२० रोजी रौंड गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदरचे क्षेत्र कांदळवन क्षेत्रालगत असल्याने

बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या संबंधित विभागास मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी दिनांक १५/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये दक्षता घेण्याबाबत कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात प्राणवायू गळतीमुळे कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाल्याबाबत

**(८) ८५९२ (१८-०६-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात प्राणवायूच्या (oxygen) टाकीची गळती होऊन २२ कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुर्घटनेचा तपास करण्यासाठी शासनाने उच्चस्तरीय समिती गठीत करुन मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्याची घोषणा केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच सर्व मृतांच्या वारसांना पाच लाख रुपयांची मदत प्रत्यक्षात अदा करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१०-२०२१)** : (१) होय.

नाशिक महानगरपालिकेच्या डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात दिनांक २१/०४/२०२१ रोजी ऑक्सीजन टाकीच्या गळतीची दुर्घटना झाली होती. यावेळी रुग्णालयात दाखल असलेल्या एकूण १५७ कोव्हीड बाधित रुग्णांपैकी २२ रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

(२) व (३) • सदर दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी शासनामार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती.

- विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक ०२/०५/२०२१ अन्वये समितीचा अहवाल शासनास सादर केला आहे.
- भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून मानक कार्यप्रणाली बाबत समितीने अहवालात केलेल्या शिफारशीनुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिनांक १५/०६/२०२१ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.
- नाशिक महानगरपालिकेचे ऑक्सीजन सिलेंडरचे पुरवठादार ठेकेदार यांचेविरुध्द आर्थिक दंडात्मक कार्यवाही आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांच्यामार्फत करण्यात आली आहे.
- सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत भद्रकाली पोलीस स्टेशन, नाशिक येथे दिनांक २२/०४/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
- सदर दुर्घटनेमध्ये दुर्दैवी मृत्यू झालेल्या २२ रुग्णांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधुन प्रत्येकी रुपये ५ लक्ष व नाशिक महानगरपालिकेमार्फत प्रत्येकी रुपये ५ लक्ष याप्रमाणे आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. त्यापैकी २० रुग्णांचे वारस निश्चित झाल्याने त्यांना प्रत्यक्ष रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरित ०२ मयत रुग्णांचे वारस निश्चित झाले असून त्यांना देखील वरीलप्रमाणे रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी शहरातील महानगरपालिकेच्या जागेवरील तसेच रस्त्यावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(९) ८७०५ (११-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ६८७१ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील महानगरपालिकेच्या जागेवर तसेच रस्त्यांच्या दुतर्फा, शाळा, मार्केट आदी भागात करण्यात आलेली अतिक्रमणे निष्कासित करण्यासंदर्भात विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी आयुक्त, परभणी शहर महानगरपालिका यांना दूरध्वनीवरुन सूचना दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या सुओ मोटो रिट याचिकेमुळे (क्र.९३४३/२०२०) मा.न्यायालयाने अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यास स्थगिती दिल्यामुळे दिनांक ३१ जानेवारी, २०२१ पर्यंत अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत शहरातील २४० पेक्षा जास्त अतिक्रमणे दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ पासून निष्कासित केलेली असून, उर्वरित अतिक्रमणे काढण्याची महानगरपालिकेकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, तसेच शहरातील नागरीक व व्यवसायिक यांना राहती घरे व व्यवसायाच्या ठिकाणी नाल्यांवर बांधलेले ओटे, फरश्यांचे आवरण तसेच नालाच्या समोर उभारण्यात आलेली कच्च्या व पक्क्या स्वरुपाची अतिक्रमणे काढण्याबाबत निर्देश देण्यात येवूनही अद्याप सदर अतिक्रमण निष्कासित करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परभणी शहरात हॉकर्स झोन तयार करण्यासाठी फेरिवाल्यांचे सर्वेक्षण करुन फेरिवाला प्राथमिक झोन तयार करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत सुरु असलेली प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०९/१२/२०२० च्या आदेशान्वये सुमोटो रिट याचिका क्र.९३४३२/२०२० मध्ये अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे दिनांक ३१/०१/२०२१ पर्यंत काढण्याबाबत स्थगिती दिली होती.
(३) परभणी महानगरपालिकेने शहरातील अतिक्रमणांचे सर्वेक्षण करुन २६० पेक्षाही जास्त अतिक्रमणे निष्कासित केली असून, उर्वरित अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.

निष्कासित करण्यात आलेल्या अतिक्रमणांच्या जागी पुन्हा अतिक्रमणे होणार नाहीत याबाबत महानगरपालिकेकडून दक्षता घेण्यात येत आहे.

शहरातील नागरीक व व्यावसायिक यांनी निवासी व व्यवसायाच्या ठिकाणी केलेली अतिक्रमणे काढून टाकण्याचे निर्देश महानगरपालिकेने दिले आहेत. त्यानुसार संबंधितांनी अतिक्रमणे काढण्याची सुरुवात केली आहे.
(४) परभणी शहरात हॉकर्स झोन करण्यासाठी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यात आले. शहरातील फेरीवाला झोनचे प्राथमिक झोन तयार करण्यात आले असून, सदर झोन अंतिम करण्याची कार्यवाही परभणी महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्हयातील स्वच्छभारत अभियानांतर्गत शौचालयाच्या कामात गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत

**(१०) ८७३२ (१८-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील स्वच्छभारत अभियानांतर्गत ग्रामीण भागात शौचालयाच्या कामावर कोट्यवधीचा निधी खर्च केल्याचे कागदोपत्री दाखवून गैरव्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी आढळून आलेले तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी व इतर सर्व दोषीं विरोधात विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनाकडे सादर केलेल्या अहवालावर अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने सदर प्रकरणी गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी/तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी मुख्य सचिव यांच्याकडे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ई-मेलव्दारे नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने परभणी जिल्ह्यातील शौचालयाच्या कामात गैरव्यवहारात दोषी असणारे सर्व वरिष्ठ व कनिष्ठ अधिकारी यांना निलंबित करणे व त्यांच्याकडून शासनाचे झालेले नुकसान वसुल करणे, याबाबत मुख्य सचिव यांच्यास्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, त्याबाबतची थोडक्यात व सविस्तर माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, वित्त विभागाचे शासन निर्णय दिनांक १८/०१/२०१६ अन्वये राज्य शासनाचा सार्वत्रिक उपक्रमाचा अतिरिक्त निधी प्रादेशिक ग्रामीण बँकामध्ये गुंतवण्याबाबतच्या निर्देशाच्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियानाचा निधी राष्ट्रीयकृत बँकेतून काढून महाराष्ट्र ग्रामीण बँकेमध्ये नव्याने खाते उघडून वर्ग करण्यात आलेला होता स्वच्छ भारत मिशन अंतर्गत परभणी जिल्ह्यातील वैयक्तिक शौचालयांची कामे पूर्ण झालेली असून जिल्हा हागणदारी मुक्त झालेला आहे तसेच सरस्वती स्वयंसहायता महिला बचत गटास आणि श्रीसिध्देश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान या संस्थांना वितरित करण्यात आलेला निधी स्वच्छ भारत मिशनच्या खात्यावर पुन्हा जमा केलेला आहे. या प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.
(२) हे खरे नाही.

(३) या प्रकरणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांच्याविरूध्द अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६९ च्या नियम ८ अंतर्गत सुरू करण्यात आलेली विभागीय चौकशीची कार्यवाही बंद करण्याबाबत सा.प्र.वि. च्या दिनांक ०२/०२/२०२१ च्या आदेशान्वये शासनाने निर्णय घेतला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील सिंचन प्रकल्प अपूर्ण असल्याबाबत

**(११) ८७५३ (१५-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील १२४ सिंचन प्रकल्पांपैकी ९३ सिंचन प्रकल्प पूर्णत्वास गेले असून सिंचन क्षमता १ लाख ११ हजार ६७४ हेक्टर एवढी असून तितक्याच क्षमतेचे जिल्हयात सिंचन होत असल्याची माहिती पाटबंधारे विभागाकडून मा.मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आली असून जिल्हयात सद्य:स्थितीत २ मोठे, २ मध्यम व २३ लघु सिंचन प्रकल्प असे एकूण २७ प्रकल्प बांधकामाधीन असून ४ प्रकल्पांची कामे सुरू नसल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यवतमाळ जिल्हयातील पूस, अडाण, अरुणावती, बेंबळा व गोकी या सिंचन प्रकल्पामध्ये सिंचन होत नसल्याने शेती सिंचनाबाबत शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून निम्न पैनगंगा प्रकल्प, बेंबळा प्रकल्पाचे काम ही अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी सिंचन क्षमतेबाबत मा.मुख्यमंत्री यांना खोटी आकडेवारी सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यवतमाळ जिल्हयातील अर्धवट स्थितीत असलेले सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेऊन तेथील सिंचन क्षमता वाढविण्याबाबत कार्यवाही करुन या

प्रकल्पाची सिंचन क्षमतेबाबत मा.मुख्यमंत्री यांना खोटी आकडेवारी सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२०-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. यवतमाळ जिल्ह्यात १२० सिंचन प्रकल्प आहेत. त्यापैकी एकूण ९४ प्रकल्प पूर्ण झालेले आहेत.

तसेच २ मोठे, २ मध्यम व २२ लघु प्रकल्प याप्रमाणे एकूण २६ प्रकल्प बांधकामाधीन आहेत.

यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ, यवतमाळ अंतर्गत बांधकामाधीन २ मोठे (बेंबळा, निम्न पैनगंगा) २ मध्यम (वर्धा बॅरेज व टाकळी डोलारी) व २२ लघु प्रकल्प असून एकूण प्रकल्पीय सिंचन क्षमता ४,१८,४२२ हे. आहे, त्यापैकी जून, २०२१ अखेर १,८१,७९३ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

बेंबळा प्रकल्प बांधकामाधीन अंतिम टप्प्यात असून प्रकल्पाची उर्वरित कामे मार्च-२०२२ पर्यंत पूर्ण करणे नियोजित आहे.

२ मध्यम प्रकल्प (वर्धा बॅरेज व टाकळी डोलारी) प्रगतीत असून टाकळी डोलारी प्रकल्प हा प्राथमिक अवस्थेत असून वर्धा बॅरेज प्रकल्पाच्या बॅरेजचे काम अंदाजे ६०% पूर्ण झाले असून जून, २०२३ पर्यंत पूर्ण करणे नियोजित आहे.

यवतमाळ मंडळांतर्गत असलेले २२ लघु प्रकल्पापैकी ८ प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले आहेत व १४ प्रकल्प सन २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. भौतीकदृष्टया पूर्ण झालेल्या प्रकल्पावर सिंचन सुरू आहे.

चार प्रकल्पांची कामे सुरु नसल्याचे अनुषंगाने नमूद करण्यात येते की, शासनाचे नवीन धोरणानुसार ६०० हे. पेक्षा कमी सिंचन क्षमता असलेले बांधकामाधीन प्रकल्प जलसंधारण विभागास हस्तातंरणाचे निर्देश असल्याने यवतमाळ मंडळाकडील धनसळ, पांढूर्णा, खरबी व सांडवा हे ०४ लघु प्रकल्प (प्राथमिक अवस्थेत) जलसंधारण विभागास हस्तातंरीत करण्यात आले आहे.
(२) पुस, अडाण व अरुणावती या प्रकल्पावर एकूण ४३,२५३ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे व सन २०१६-१७ मध्ये ३१,१११ हे. महत्तम सिंचन करण्यात आलेले आहे.

बेंबळा मोठा प्रकल्प केंद्र पुरस्कृत PMKSY योजनेत समाविष्ट असून केंद्र शासन तसेच राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होत आहे. बेंबळा प्रकल्प बांधकामाधीन अंतिम टप्प्यात असून प्रकल्पावर एकूण ५२४२३ हे. पैकी जून, २०२१ अखेर ४४९०२ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. प्रकल्पाची उर्वरित कामे मार्च, २०२२ पर्यंत पूर्ण करणे नियोजित आहे.

निम्न पैनगंगा प्रकल्प धरण विरोधी संघर्ष समिती व स्थानिक नागरिकांचे विरोधामुळे बंद आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बांधकाम मंजूरांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१२) ८७७६ (१७-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत नोंदणी असलेल्या बांधकाम मजूरांना महिना रुपये १५०० देण्याची घोषणा करून अनेक दिवस होऊनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याने राज्यातील १२ लाख नोंदणीकृत व ६ हजाराहून अधिक नोंदणी न झालेले बांधकाम मजुर या आर्थिक सहाय्यापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली, गडचिरोली, गोंदिया व इतर जिल्ह्यातील बांधकाम मजूरांचे अर्ज कामगार आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीसाठी प्रलंबित आहेत, तसेच नोंदणी केलेल्या व नोंदणी न केलेल्या सर्वच बांधकाम मजूरांना तात्काळ मदत देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व बांधकाम मजूरांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांच्या प्रलंबित अर्जांची नोंदणी करून विविध योजनांचा लाभ मिळणेबाबत तसेच इतर मागण्यांबाबत राष्ट्रीय बहुजन कामगार महासंघाचे अध्यक्ष संदीप पाटोळे यांनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.कामगार मंत्री व सहाय्यक आयुक्त, सांगली यांना निवेदनाद्वारे मागणी केली असून बांधकाम कामगारांसाठी जाहीर केलेल्या अर्थसहाय्याचा लाभ उक्त कामगारांना त्यांचे नोंदणी अर्ज प्रलंबित असल्यामुळे मिळणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नोंदणीकृत बांधकाम मजूरांना दरमहा दीड हजार रूपये अदा न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सांगली, गडचिरोली, गोंदिया व इतर जिल्हयातील बांधकाम कामगारांच्या प्रलंबित अर्जांची नोंदणी करून कोरोना काळात त्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत तसेच त्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१३-१०-२०२१) :** (१) मा.मुख्यमंत्री यांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत राज्यात ब्रेक द चेन अंतर्गत निर्बंध घोषित करतांना दिनांक १३/०४/२०२१ रोजी घोषणा केल्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदित ११,७८,५७४ बांधकाम कामगार लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये १,५००/- प्रमाणे रुपये १७६.७८ कोटी इतके अर्थसहाय्य थेट डीबीटी पध्दतीने त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने दिनांक २३/०७/२०२० पासून बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाची कार्यवाही संगणकीय प्रणालीद्वारे सुरु केलेली आहे. सदर संगणक प्रणालीवर कामगारांनी सादर केलेले अर्ज तपासणीकरीता लागत असलेल्या कालावधीमुळे प्रलंबित दिसत आहेत.

नोंदणी केलेल्या व नोंदणी न केलेल्या सर्वच बांधकाम कामगारांना तात्काळ मदत देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व बांधकाम मजुरांनी मागणी केलेली नाही.

(३) होय, हे खरे आहे.

अध्यक्ष, राष्ट्रीय बहुजन कामगार महासंघ, सांगली यांनी दिनांक १२/१२/२०२० रोजीच्या निवेदनाद्वारे बांधकाम कामगारांना शैक्षणिक लाभ इ. मिळण्याबाबत निवेदन केले असता त्यांना मंडळाच्या दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली यांना प्रलंबित अर्ज लवकरात लवकर ऑनलाईन पध्दतीने निकाली काढून अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने दिनांक २३/०७/२०२० पासून बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाची कार्यवाही संगणकीय प्रणालीद्वारे सुरु केलेली आहे. सदर संगणक प्रणालीवर कामगारांनी सादर केलेले अर्ज तपासणीकरीता लागत असलेल्या कालावधीमुळे प्रलंबित दिसत आहेत. नोंदणी केलेल्या व नोंदणी न केलेल्या सर्वच बांधकाम कामगारांना तात्काळ मदत देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व बांधकाम मजुरांनी मागणी केलेली नाही.

(४) मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक १३/०४/२०२१ रोजी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत दिनांक १३/०४/२०२१ वा त्या अगोदर मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगार लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये १५००/- इतके अर्थसहाय्य देण्याचे घोषित केले आहे. मंडळांतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगार लाभार्थ्यांना प्रत्येकी रुपये १५००/- इतके एक वेळचे अर्थसहाय्य देण्याचे घोषित केले आहे. त्यानुसार मंडळांतर्गत ११,७८,५७४ बांधकाम कामगारांना रुपये १७६.७८ कोटी अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## हिवरी (ता.मारेगाव, जि.यवतमाळ) येथील वन जमिनीवर गौण खनिजाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(१३) ८७८७ (१८-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरी (ता.मारेगाव, जि.यवतमाळ) वन परिक्षेत्रातील शहरालगतचे माळ पठार, दारव्हा रोड, गोधनी बायपास रोड येथील मोठे डोंगर पोखरून कोट्यवधी रुपयांचे माती, दगड, मुरूम इत्यादी गौण खनिजांचे अवैधरित्या उत्खनन सुरू असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिवरी वन परिक्षेत्रातील गौण खनिजांच्या अवैधरित्या होणाऱ्या उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असून, पर्यावरणाचा ऱ्हास होत असताना सुध्दा याकडे वन विभागातील अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्या दोषींवर व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ वन विभागांतर्गत हिवरी व यवतमाळ वन परिक्षेत्रातील शहरालगतचे माळ पठार, दारव्हा रोड, गोधनी बायपास रोड येथे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान वन जमिनीवर अवैध उत्खनन आढळले नाही किंवा सुरु असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) उक्त प्रकरणी वन जमिनीवर गौण खनिजाचे अवैधरित्या उत्खनन झाले नसल्यामुळे, शासनाचा महसूल बुडण्याचा व पर्यावरणाचा ऱ्हास होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तळेगांव ते पुलगाव (जि.वर्धा) रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१४) ८८०१ (१५-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगांव ते पुलगाव (जि.वर्धा) रस्त्याचे काम गत ३ वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक ४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याचे काम विहित कालावधीत पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करुन सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१४-१०-२०२१) :** (१) व (२) तळेगांव-आर्वी-पूलगाव हा रस्ता रा.म.क्र.३४७-अे चा भाग असून या भागाची लांबी ४६.८० कि.मी.आहे. यापैकी तळेगांव ते आर्वी या १३.७० कि.मी. लांबीच्या सिमेंट कॉंक्रिट रस्त्याच्या बांधकामास मे.वशिष्ठ प्रोजेक्ट, हैद्राबाद यांना दिनांक ११/१०/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात येऊन काम हाती घेण्यात आले होते. तथापि, सदर कंत्राटदाराकडून कामाची प्रगती समाधानकारक न राखल्याने सदर करारनामा दिनांक २५/०९/२०२० रोजी रद्द करण्यात आला. त्यानंतर सदर कामामधील उर्वरित कामाकरीता दिनांक १४/०१/२०२१ रोजी नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार नवीन कंत्राटदारामार्फत उर्वरित काम प्रगतीपथावर असून लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच पूलगाव ते आर्वी या भागात मागील तीन वर्षापासून कोणतेही काम अपूर्णावस्थेत नसून सदर रस्ता वाहतुकीस योग्य आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील बांधकाम मजूरांच्या निधी वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) ८८१९ (२२-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील इमारत बांधकाम मजुर कामगांराना आर्थिक बळ मिळण्याच्यादृष्टीने कामगारांकरीता दिनांक १४ मे ते ९ सप्टेंबर, २०२० मध्ये नोंदणी शिबिर राबविले गेले असता १८२१८ कामगारांची नोंदणी करून २३ कोटी ५ लाख ६५ हजार ८०० कामगारांना तत्कालीन कामगार अधिकारी यांच्याकडून निधी वाटप केला असता त्यात गैरप्रकार झाल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय अभिलेखावर १० हजार ३१८ कामगारांना आर्थिक लाभ मिळाल्याचे निदर्शनास येवून त्यात रुपये ५ कोटी ७९ लाख ९ हजार ४०० एवढया रकमेचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२५-०६-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.

वर्धा जिल्ह्यात दिनांक १४ मे, २०२० ते दिनांक ०९ सप्टेंबर, २०२० या कालावधीत कोणतीही नोंदणी शिबीर राबविण्यात आले नाही. परंतु निधीच्या वाटपात वित्तीय अनियमितता झाल्याची बाब चौकशी समितीच्या निदर्शनास आली.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी अहवालाचे निष्कर्ष विचारात घेऊन दोषी आढळलेल्या अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचारी यांचेविरुध्द रामनगर

पोलीस स्टेशन, वर्धा येथे भारतीय दंड सहिता अधिनियम १८६० चे कलम ४०९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४७७-अ, ३४ व १२०-ब अन्वये दिनांक २३/०४/२०२१ रोजी गुन्हा दाखल केला आहे. तसेच, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या कलम १२ अन्वये एकत्रित विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली असून दिनांक २३/०६/२०२१ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ताडगांव ते मन्नेराजरम (ता.भामरागड, जि.गडचिरोली) येथील पुलाचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(१६) ८८२१ (१५-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडगांव ते मन्नेराजरम (ता.भामरागड, जि.गडचिरोली) येथील अतिदुर्गम भागातील रस्त्यावर पुलाचे बांधकाम सुरू असल्याने स्थानिकांना उक्त ठिकाणावरुन प्रवास करणे गैरसोयीचे होत असल्याचे दिनांक ३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पूलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०५-१०-२०२१) :** (१) होय. हे अंशतः खरे आहे.

विषयांकीत रस्त्याच्या दर्जोन्नतीचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर असून वन विभागाच्या हरकतीमुळे सदर काम पूर्ण होऊ शकलेले नाही. वन विभागास विनंती केल्यानुसार एक विशेष बाब म्हणून परवानगी दिल्यामुळे सदर रस्त्यावरील छोट्या पुलांचे काम पूर्ण करण्यात आले. त्याचा फायदा नजिकच्या २० गावांना झाला असून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु आहे.

विषयांकीत रस्त्यांच्या कामांमधील २८ छोटे पुल पूर्ण करण्यात आले असून २ छोट्या पुलांवर स्लॅबची तयारी सुरु आहे. दिनांक २५ मे, २०२१ पर्यंत पोच मार्गावरील मातीकाम पूर्ण झालेले असून तात्पुरती वाहतूक पुलावरुन सुरु करण्यात आली आहे. तसेच रस्त्यांच्या कामांमधील एकूण ३० पुलांवर खडीकरण पूर्ण करुन पावसाळ्यामध्ये वाहतुकीला अडचण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा प्रकल्पासाठी मुमरी धरण घाट रस्ता व कालव्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१७) ८९६० (१५-०७-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील भातसा प्रकल्पासाठी मुमरी धरण घाट रस्ता व कालवे याकरीता एकूण ६८१.५८९ हे. वनजमिनीच्या नक्त वर्तमान मूल्यापोटी (NPV) रुपये १०४.९४ कोटी रक्कम माहे मे, २०१३ मध्ये वन विभागास अदा करुनही सदरचा प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित असल्यामुळे कालव्याची कामे प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण ६८१.५८९ हे. वन जमिनीपैकी मुमरी धरण व घाट ४१२.१३५ हे. वनक्षेत्राबाबत अंतिम मान्यता माहे मे, २०१४ मध्ये प्राप्त आहे, कालव्यांकरीता आवश्यक २६९.४५४ हे. वनजमिनीच्या अंतिम मान्यतेसाठी आवश्यक सर्व बाबींची पूर्तता करुन मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला असून, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागाची मान्यता मिळण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, कालव्याच्या प्रस्तावाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०६-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अद्याप कार्यवाही पूर्ण झाली नाही.

कालव्यासाठी आवश्यक २६९.४५४ हेक्टर वनजमीन अंतिम मान्यतेचा प्रस्ताव महसूल व वन विभाग, मंत्रालय, यांनी त्यांचे पत्र No.FLD-१२०६/CR-१८८/F-१०, दिनांक २२/०३/२०२१ अन्वये वन व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे सादर केला असून त्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोईसर-चिल्हार (जि.पालघर) रस्त्याचे काम वर्षभरापासून प्रलंबित असल्याबाबत

**(१८) ८९६९ (१८-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर-चिल्हार (जि.पालघर) रस्त्याचे काम वर्षभरापासून प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमीन मालकांचे प्रश्न निकालात काढून तातडीने रस्त्याचे काम सुरु करा, असे आदेश जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रांताधिकाऱ्यांना देवूनही सदर रस्त्याचे काम अद्याप सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

बोईसर-चिल्हार (जि.पालघर) येथील रस्त्याची लांबी १६.५० कि.मी लांबीमध्ये ३० मीटर रुंदीचे क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अंतर्गत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन या क्षेत्राचे संपादन सन-१९८१ दरम्यान, उपविभागीय अधिकारी, डहाणू यांनी केले आहे.

सदर १६.५० कि.मी. मधील रस्त्याचे १४ कि.मी. पर्यंतचे रस्त्याचे चौपदरी करण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित २.५० कि.मी. लांबीचे रस्त्याचे कामात स्थानिक ग्रामस्थ पूर्वी मोबदला कमी दिला आहे. तसेच ७/१२ वर मऔवि महामंडळाचे नाव नाही, असे सबब दर्शवून रस्त्याच्या कामात अडथळे आणत आहेत. त्यामुळे मऔवि महामंडळातर्फे जिल्हाधिकारी, पालघर यांना सहकार्य करण्याबाबत कळविण्यात आले असता, जिल्हाधिकारी, पालघर यांनी सदर प्रकरणी उचित कार्यवाही करण्याबाबत तसेच संपादन संस्थेस (मऔवि महामंडळास) आवश्यकता असल्यास पोलीस बंदोबस्त पुरविण्याबाबत उप विभागीय अधिकारी, पालघर यांना निर्देश दिलेले आहेत.

(३) दिनांक ०१/०१/२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी, पालघर यांनी रस्त्याच्या कामाच्या अडचणीबाबत मा.आमदार, बोईसर तसेच ७ गावांच्या ग्रामस्थांसमवेत बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे मौजे गुंदले, लालोंडे, नागझरी, चरी, वेळगाव, खुटल व चिल्लार या गावांतील रस्त्यांच्या सिमांकनाबाबतची पुर्नमोजणी तालुका भुमि अभिलेख, पालघर यांचेकडून दिनांक ०२/०२/२०२१ ते १६/०२/२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत १२९ खातेदारांपैकी ४६ सर्व्हे नंबरची ७/१२ वर मऔविम/ महाराष्ट्र शासन अशी नोंद झाली आहे. उर्वरित सर्व्हे नंबर ७/१२ वर नाव फेरफार प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पालघर यांचेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील (जि.ठाणे) रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम न भरल्याबाबत

**(१९) ८९७९ (१५-०७-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ च्या कायद्यानुसार ठेकेदाराने रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची तरतूद करण्याचे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीत ठेकेदारांनी रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीचा भरणा केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामगारांचा भविष्य निर्वाह निधी भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

भारतीय राजपत्र (The Gazette of India) मध्ये The Employees Provident Funds & Miscellaneous Provisions Act,१९५२ ची अधिसूचना दिनांक ०८/०१/२०११ रोजी प्रसिध्द झाली असून सदर अधिसूचना प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून नगरपरिषद व महानगरपालिका यांना लागू करण्यात आली आहे.

कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेस दिनांक ०३/०३/२०१४ रोजी ई.पी.एफ. कोड प्राप्त झाला असून महानगरपालिकेतील कंत्राटी/रोजंदारी/ठोक वेतन तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा ई.पी.एफ. कर्मचारी हिस्सा व महानगरपालिकेचा हिस्सा ई.पी.एफ. कार्यालयात माहे एप्रिल २०१६ पासून नियमितपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे वेळोवेळी जमा करण्यात आलेला आहे.
(३) कर्मचारी भविष्य निधी संस्था, श्रम व रोजगार मंत्रालय भारत सरकार यांच्या अधिनस्त क्षेत्रिय भविष्य निधी आयुक्त-१, क्षेत्रिय कार्यालय, ठाणे (उत्तर) यांनी सन २०११ ते सन २०१५ या कालावधी करीता कल्याण-डोबिंवली महानगरपालिका यांचेवर कंत्राटी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या अनुषंगाने कारवाई केली असून रुपये ११०,०७,४७,८३८/- चा भरणा निश्चित केला आहे.

तथापि, माहे जानेवारी, २०११ ते मार्च, २०१६ या कालावधीमधील महापालिकेतील नोंदणीकृत व बिगर नोंदणीकृत कंत्राटदारानी केलेल्या विविध कामाकरीता ईपीएफ भरला नसल्याची बाब आयुक्त, भविष्य निर्वाह निधी कार्यालय, ठाणे यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. त्या अनुषंगाने या कालावधीतील कंत्राटदाराने

त्यांचेकडील कामगारांची ईपीएफ रक्कम ईपीएफ कार्यालयाकडे जमा केली आहे किंवा कसे? याचे पृष्ठर्थ ईपीएफ चलन, हजेरीपत्रक, वेतन रजिस्टर इ. उपलब्ध करुन देण्याबाबत कंत्राटदारांना नोटीसा देण्यात आल्या आहेत/येत आहेत.

उक्त नमूद कालावधीतील कंत्राटदार तसेच तेव्हा त्यांचेकडे काम करीत असलेले कामगार शोधणे काही प्रकरणामध्ये शक्य होत नाही. तथापि, त्यांचा शोध घेण्याची मोहीम सुरु आहे. आयुक्त भविष्य निर्वाह निधी कार्यालय, ठाणे यांनी मागणी केल्याप्रमाणे अभिलेखे प्राप्त झाल्यास त्याबाबतची माहिती ईपीएफ कार्यालयास देण्यात येईल, तद्नंतर पुढील कार्यवाही त्यांचेमार्फत केली जाईल असे आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगोले (जि.सोलापूर) तालुक्यातील माण नदीवरील बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) ८९९४ (१०-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोले (जि.सोलापूर) तालुक्यात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे माण नदीवरील एकूण पाच बंधाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधारे दुरुस्तीची घोषणा करुनही बंधारे दुरुस्ती करण्याकरीता एकूण अंदाजे रुपये ३ कोटी ४६ लाखाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून निधी अभावी बंधाऱ्याच्या दुरुस्ती झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बंधारे दुरुस्ती करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२०-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अतिवृष्टीमुळे नुकसानीच्या कामासंदर्भात मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची दिनांक २५/०१/२०२१ रोजी पुणे येथे आढावा बैठक झाली. सदर बैठकीमध्ये सोलापूर जिल्हयातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या को.प. बंधाऱ्यांच्या दुरूस्ती कामासंदर्भात सचिव (मदत व पुनर्वसन) यांना रुपये १३.१० कोटी रकमेच्या प्रस्तावास निधी उपलब्ध करून देणेबाबत मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी सूचना दिल्या आहेत.

त्यात सांगोला तालुक्यात माण नदीवरील एकूण १६ बंधाऱ्यांपैकी विशेषत: सावे, बलवडी, वाटंबरे, चिनके व सांगोला या ५ को.प.बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या रुपये २.८१ कोटी इतक्या रकमेचा प्रस्तावामध्ये समावेश आहे. तसेच उर्वरित अंशत: नुकसानग्रस्त को.प. बंधारा लोटेवाडी, मांजरी, कडलास, खवासपुर, वासुद, बामणी, नाझरे आणि कमलापुर या ८ को.प.बंधाऱ्यांचे रुपये ५५ लक्ष कामांचा रुपये १३.१० कोटी रकमेच्या प्रस्तावात समावेश आहे. को.प.बंधारा दुरूस्तीचे कामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत सदर आढावा बैठकीत तत्वत: मान्यता दिलेली आहे.

तथापि, सद्य:स्थितीत सावे, बलवडी, वाटंबरे, चिनके व सांगोला या ५ को.प.बंधाऱ्यांच्या दुरूस्ती कामास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे या कार्यालयाने सन २०२१-२२ अंतर्गत बिगर सिंचन प्रापणसूचीस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून निविदा निश्चित करण्याचे काम सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नालासोपारा येथील रुग्णालयामध्ये कोरोना रुग्ण ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे दगावल्याबाबत

**(२१) ९००० (११-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीमधील रुग्णालयात ऑक्सिजन गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने नालासोपारा येथील दोन रुग्णालयामध्ये ऑक्सिजन अभावी दहा कोरोना रुग्णाचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयामध्ये केवळ तीन तास पुरेल इतके ऑक्सिजन असल्याचे निदर्शनास आले असूनही रुग्णालयामार्फत अतिरिक्त ऑक्सिजन पुरवठ्यासाठी पाठपुरवठा करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त प्रकरणी दोषीं आढळून आलेल्यांवर महानगरपालिका व स्थानिक प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१०-२०२१)** : (१) वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विनायका रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील ७ रुग्ण व रिध्दीविनायक रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील ३ रुग्णांचा दिनांक १२/०४/२०२१ रोजी मृत्यू झाल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, सदर रुग्ण कोविडच्या अतिगंभीर परिस्थितीत असल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे. तसेच सदर रुग्णांच्या मृत्यूची वेगवेगळी वेळ, सदर रुग्णालयाची ऑक्सिजनबाबतची स्वयंपूर्णता व त्याच दिवशी घटनास्थळी महानगरपालिकेच्या पथकाने केलेली शहानिशा यावरुन सदर रुग्णांचा मृत्यू ऑक्सिजन कमतरतेमुळे झाला नसल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) व (३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने विनायका रुग्णालय व रिध्दीविनायक रुग्णालयाच्या ऑक्सिजन पुरवठाबाबत खालील वस्तुस्थिती कळविली आहे. :-

- उपरोक्त दोन्ही रुग्णालय ही खाजगी कोविड रुग्णालय आहेत
- विनायका रुग्णालयास दिनांक ११/०४/२०२१ रोजी अधिकृत ऑक्सिजन पुरवठादाराकडून १३९ जम्बो सिलेंडर व १ ड्युरा सिलेंडर ऑक्सिजन पुरवठा करण्यात आला होता.

- विनायका रुग्णालायाच्या तळ मजल्यावरच पुरवठादाराचे ऑक्सिजन डेपो स्थित आहे.
- तसेच रिध्दी विनायक रुग्णालयास खाजगी ऑक्सिजन पुरवठादाराकडून दिनांक ११/०४/२०२१ व दिनांक १२/०४/२०२१ या कालावधीत रुग्णालयाच्या मागणीनुसार ११० जम्बो सिलेंडर पुरविण्यात आले आहे. उपरोक्त रुग्णालयाचे स्वत:चे ऑक्सिजन जनरेशन प्लांट आहे.
- विनायका रुग्णालय व रिध्दीविनायक रुग्णालय ही दोन्ही रुग्णालये ऑक्सिजन स्वयंपूर्ण आहेत.

वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोविड रुग्णालयांना महानगरपालिकेने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या समन्वयाने खाजगी ऑक्सिजन पुरवठादारांकडून त्यांचे ऑक्सिजन प्लांट ताब्यात घेऊन आवश्यकतेनुसार नियमितपणे ऑक्सिजन पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले आहे. सदर पुरवठा सुरळीत रहावा याकरीता महानगरपालिकेमार्फत समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे महानगरपालिकेच्या दिनदयाळ अंत्योदय राष्ट्रीय नागरिक उपजीविका अभियान संस्थेने गैरव्यवहार केल्याबाबत

**(२२) ९१११ (११-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे महानगरपालिकेच्या दिनदयाळ राष्ट्रीय नागरिक उपजीविका अभियान संस्थेमार्फत सन २०१८ मध्ये तरुणांना रोजगाराचे प्रशिक्षण देताना गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येवूनही दोषींवर अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागातील व्यवस्थापक श्री.दिपक खोडे यांनी मर्जीतील संस्थांना प्रशिक्षण केंद्र देवून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यामुळे आयुक्त, धुळे महानगरपालिका यांनी चौकशीचे आदेश देवूनही अद्यापही चौकशीचा अहवाल सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

धुळे महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान मधील ESTP घटकाअंतर्गत प्रशिक्षण बॅचला मंजुरी देण्याबाबत आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार केल्याबाबत प्रकल्प व्यवस्थापक यांच्याविरुध्द जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती. परंतु याबाबत धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या चौकशीत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) या प्रकरणी धुळे महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

महानगरपालिका स्तरावर करण्यात आलेल्या चौकशीत व्यवस्थापक श्री.दिपक खोंडे यांनी प्रशासकीय कामाकाजात अनियमितता केल्याचे दिसून येत असल्याने, त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, धुळे महानगरपालिका यांनी दिनांक २१/०६/२०२१ अन्वये संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्याकडे अहवाल सादर केला आहे.

श्री.खोंडे यांचेकडून आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, प्रशासकीय कामकाजातील त्रुटींची दखल घेऊन श्री.खोंडे यांची बदली करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किनवट (जि.नांदेड) नगरपरिषदेच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(२३) ९१३५ (११-०६-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ६७२४ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) शहरामध्ये अनेक ठिकाणी नगरपालिका प्रशासनाच्या जागांवर अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपरिषदेच्या जागांवर अतिक्रमणे असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे सर्वेक्षणाचे काम सुरु करुन अतिक्रमण आढळल्यास नगरपरिषद स्तरावर ते निष्कासित करण्याची कार्यवाही केली जात असल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने किनवट नगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर अतिक्रमण करणाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) कोविड-१९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता, जनतेचा जमाव होण्याची शक्यता असल्याने, नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमण निष्कासित करावयाची कार्यवाही प्रलंबित असल्याचे व नगरपरिषदेच्या मालकीच्या उर्वरित जागांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता नगरपरिषद घेत असल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.

---

## राज्यातील व्यापार क्षेत्राचे टाळेबंदी काळात कोट्यवधीचे नुकसान झाल्याबाबत

**(२४) ९१३८ (१०-०६-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या काळात व्यावसायिकांना कठोर निर्बंध घालण्यात आले असून लघु-मध्यम तसेच मोठे व्यापार ठप्प झाले असून आर्थिक अडचणीना सामोरे जावे लागत असल्यामुळे देशाला ७० हजार कोटी रुपयांचा फटका बसला असल्याचे अहवालातून माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व नागपूर या सारखी शहरे व्यापारात अग्रेसर असून विशेष नियोजनाची गरज होती तसेच इतर व्यावसायिकांना टाळेबंदी जाहीर असतानाही नियम शिथिल करून व्यापार करण्यास मुभा देणे आवश्यक होते या संदर्भात लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने शासनास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यापाऱ्यांचे कोरोनासदृश्य परिस्थितीत टाळेबंदी काळात झालेले नुकसानाची पुनरावृत्ती होवू नये तसेच उद्योगधंद्यांस, व्यापारास नवी उभारी मिळावी याकरीता शासनाने काही विशेष योजनांचे नियोजन केले आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बंद पडलेले लघु-मध्यम तसेच मोठे उद्योग पुर्ववत सुरु करुन व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळावे याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-१०-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. तथापि, टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर लघु-मध्यम तसेच मोठ्या उद्योगांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसल्याबाबतचे निवेदन किंवा अहवाल प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) कोरोना विषाणुंचा (कोविड-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता महाराष्ट्रातील सर्व उद्योग दिनांक २२ मार्च, २०२० पासून काही कालावधीकरीता बंद करण्यात आले होते. सदर कालावधीत उद्योजक भूखंडावर विकास करु शकत नसल्याने, उद्योगातील अडचणी कमी करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून दिनांक ०१/०७/२०२० रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार उद्योजकांना विविध शुल्क भरण्याकरीता विलंबशुल्क न आकारता कालावधी वाढविणे तसेच विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करण्याबाबत विविध मुभा/सूट देण्यात आलेल्या आहेत.

तसेच केंद्र शासनाच्या Emergency Credit Linked Guarantee Scheme (ECLGS) अंतर्गत दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत ४६४६८७ प्रकरणांना रुपये २३२८३.९९ कोटी इतकी मंजूरी देण्यात आली असून, २८९७५० इतक्या प्रकरणांना रुपये १७०५२.६७ कोटी इतक्या रक्कमेचे वाटप करण्यात आलेले आहे. तसेच राज्य शासनाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीत उद्योगांना आर्थिक मदत दिली जाते. तसेच राज्य सरकार २००८ पासून केंद्र पुरस्कृत पंतप्रधान रोजगार योजना (पीएमईजीपी) राबवित असून राज्यातील बेरोजगार तरुणांसाठी राज्य प्रायोजित मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) ऑगस्ट,२०१९ पासून सुरु आहे. सदर योजनेंतर्गत आर्थिक वर्ष २०२०-२१ दरम्यान जवळपास ७७६१ कर्ज प्रस्तावांमध्ये रुपये २४६ कोटी रुपये मार्जिन मनी (सबसिडी) बँकांनी मंजूर केले आहेत. त्यापैकी स्वयंरोजगारामध्ये वाढ करुन त्यांचे स्वत:चे उद्योग सुरु करण्यासाठी २३०० लाभार्थ्यांना रुपये ९४ कोटी इतकी रक्कम मार्जिन मनी (अनुदान) वितरित करण्यात आले आहे.

शासनाने औद्योगिक क्षेत्रात रोजगाराचा दर वाढविण्यासाठी नोकरी शोधणाऱ्या/बेरोजगारांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये महाजॉब पोर्टल सुरु केले आहे. तसेच राज्यात मिशन ऑक्सिजन स्वावलंबन योजना सुरु करण्यात आली असून,

प्रस्तावित नवीन व विस्तारीत ऑक्सिजन उत्पादक घटकांना विशेष प्रोत्साहने शासन निर्णय दिनांक २१ मे, २०२१ अन्वये देय करण्यात आली आहेत. या धोरणांतर्गत सुमारे १५०० मे.टन ऑक्सिजन निर्मिती क्षमतेचे जवळपास ११३ अर्ज आजमितीस शासनाकडे प्राप्त झालेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा-लातूर महामार्गावरील टेंभुर्णी-अकलूज या टप्यातील रस्त्यांची व पुलांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२५) ९१७८ (११-०६-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६४१३ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा-लातूर राष्टीय महामार्ग क्रमांक ५४८ ह्या रस्त्याचे काम केंद्र व राज्य शासनाच्या आर्थिक तरतुदींमधून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत माहे जानेवारी, २०१७ पासून सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा-लातूर महामार्गावरील टेंभुर्णी-अकलूज या टप्यातील महामार्गाच्या रस्त्यांची आणि पुलांची कामे गत ३ वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्यांची व पुलांची कामे त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२१) :** (१) सदर महामार्गाचे काम माहे ऑगस्ट, २०१७ पासून केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाचे निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रगतीपथावर सुरु आहे.
(२) टेंभूर्णी ते अकलूज या टप्प्याची लांबी १७.१६ कि.मी. असून, त्यापैकी १२.९६ कि.मी. लांबीचे काँक्रीटीकरण पूर्ण झाले आहे. उर्वरित ४.९६ कि.मी. लांबीतील काम भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करुन हाती घेण्यात येत आहे.

(३) रस्त्याची अपूर्ण कामे ही स्थानिकांनी रस्ता हद्दीबाबत वाद उत्पन्न केल्याने अपूर्ण आहेत. उपलब्ध रस्ता रुंदीमध्ये काम करण्याचे नियोजन करण्यात येत असून, उर्वरित लांबी ही लवकरात लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील सांगोला ते पंढपूर रस्त्याच्या बांधकामाबाबत

**(२६) ९१९१ (११-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील सांगोला ते पंढरपूर या सिमेंट रस्त्याचे काम गत अनेक वर्षापासून सुरु असून सदर रस्ता हा वन विभागाच्या हद्दीतून जात असल्याने त्यास वन विभागाची परवानगी नसल्यामुळे गत तीन वर्षापासून उक्त रस्त्याचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याचे कामास सुरुवात करण्यापूर्वी वन विभागाची परवानगी घेण्यात आली नसल्याने सदर काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याचे काम प्रलंबित राहण्यास जबाबदार असलेल्या दोषींवर कारवाई करुन उक्त रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२१) :** (१) होय.

सदर रस्त्याचे ९७.५५% काम पूर्ण झाले असून वन विभागाच्या हद्दीतून जाणाऱ्या ७७० मीटर लांबीचे कामास वन विभागाची परवानगी प्राप्त नसल्याने प्रलंबित आहे.
(२) नाही.

वन विभागाच्या हद्दीतील लांबीसाठी परवानगीचा प्रस्ताव वन विभागाकडे दिनांक ०४/०५/२०१८ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रस्ताव वन विभागास सादर केला असून त्यास परवानगी प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रगतीत असून परवानगी मिळाल्यावर त्वरीत रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येईल. वनविभागाकडे प्रस्ताव सन २०१८ मध्येच सादर केला असल्याने कारवाई करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही. सदर प्रस्तावास मान्यता घेण्यासाठी कार्यवाही प्रगतीत असून मान्यतेनंतर कॉंक्रीटचा रस्ता त्वरीत पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील प्रस्तावित ग्रीन फिल्ड रिफायनरी प्रकल्प उभारण्याबाबत

**(२७) ९२७३ (०९-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **उद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नाणार येथील प्रस्तावित परंतु ग्रामस्थांचे विरोधामुळे रद्द करण्यात आलेला ग्रीन फिल्ड रिफायनरी प्रकल्प पुन्हा नाणार येथेच उभारण्यात यावा, अशी मागणी राजापूर तालुकावासिय ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्‌वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार राजापूर येथील आबोळगड, नाटे परिसरात शासनाने मंजूर केलेल्या आयलॉग जेटीसाठी राखीव असलेल्या दीड हजार एकर जागेसह आजुबाजूच्या जागेत सदरचा रिफायनरी प्रकल्प राबवावा व त्यासाठी नाटे ग्रामपंचायतीने तसा ठराव मंजूर केलेला असल्याचे नमूद करुन तशी मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भात एका राजकीय पक्ष प्रमुखानी देखील मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्र देऊन रिफायनरी प्रकल्प नाणार येथे न उभारता तो अन्य ठिकाणी उभारण्यात यावा अशी मागणी उक्त पत्राद्वारे करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाणार येथील प्रकल्पाची अधिसूचना रद्द झाल्यानुसार मा.मुख्यमंत्री महोदयांनी स्थानिक जनतेची तेथे मागणी असेल तेथे रिफायनरी प्रकल्प होईल अशा दिलेल्या आश्वासनानुसार राजापूर तालुक्यातील नाणार येथील प्रस्तावित परंतु ग्रामस्थांच्या विरोधामुळे रद्द करण्यात आलेला ग्रीन फिल्ड रिफायनरी प्रकल्प पुन्हा उभारण्यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर मागणी या विभागास प्राप्त निवेदनामध्ये दिसून येत नाही.
(३) जिल्हा सरचिटणीस ठाणे ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटी, ता.मुरबाड जि.ठाणे यांचे याबाबतचे निवेदन अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे अग्रेषित केले आहे.
(४) सदर प्रकल्प रायगड वा रत्नागिरी जिल्ह्यात उभारणीबाबत शासनापुढे कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वळणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ लघु वसाहतीचे क्षेत्र वाढविणेबाबत

**(२८) ९२८९ (१३-०७-२०२१) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वळणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) लघु वसाहतीचे क्षेत्र वाढविण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील गावांना शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२९) ९३३८ (२०-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील एकूण १३३ गावांपैकी केवळ १३ गावांनाच चांदी प्रकल्पातून पाणीपुरवठा होत असल्याने इतर गावातील शेतीची सिंचन/पाण्याअभावी अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सर्व गावांना शेतीसाठी मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२०-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

अमरावती जिल्हयातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यात चांदी प्रकल्पातून १२, साखळी प्रकल्पातून ६, पिंपळगाव प्रकल्पास १ अशा २० गावांना सिंचनाकरीता पाणी देण्यात येत असून नजीकच्या भविष्यात निम्न साखळी प्रकल्पातून ९ व टिमटाळा प्रकल्पातून २ अशा ११ गावांना सिंचनाकरीता पाणी देण्यात येईल, याप्रमाणे एकूण ३० गावांना सिंचनाकरीता पाणी देण्यात येईल.

(२) या तालुक्यात राबविण्यात येणारे प्रकल्प जलद गतीने पूर्ण करून सदर प्रकल्पाचे लाभक्षेत्रात येणाऱ्या शेतजमिनीला पाणी देण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## कळवा (जि.ठाणे) शहरातील पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३०) ९४१४ (११-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवा (जि.ठाणे) शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी खाडीवर पूल उभारण्याचे काम हाती घेण्यात आले होते मात्र, गत ४ वर्षांत रुपये १०३ कोटी खर्च होऊनही सदर पुलाचे काम प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुलाच्या कामासाठी विविध सुधारणांसह जारी केलेली निविदा व कंत्राटदाराबरोबर केलेल्या कराराप्रमाणे पुलाचे काम होत नसल्यामुळे सदर कामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामास विलंब करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन उक्त पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर काम पूर्ण करण्यास विविध अडचणींमुळे उशीर झाल्यामुळे अद्यापपर्यंत ८३% काम पूर्ण झाले असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) व (३) ठाणे महानगरपालिकेने खालील नमुद केलेल्या अडचणीमुळे विहित मुदतीमध्ये काम पूर्ण झाले नसल्याची बाब कळविली आहे :-

- मा.उच्च न्यायालयाकडून पूलाचे बांधकामासाठी आवश्यक असलेल्या ०.२७४ हेक्टर इतक्या क्षेत्रातील मॅग्रोव्ह (कांदळवन) काढण्याबाबतची परवानगी दिनांक २५/०६/२०१८ रोजी प्राप्त झाली.
- उत्तमराव पाटील उद्यानाचे भागामध्ये सदर पूलाचे २६ फाऊंडेशन असल्याने तसेच खाडीकडे पूलाचे बांधकाम करणेसाठी पोहोच मार्ग उद्यानातूनच जात असल्यामुळे सदर जागेमध्ये बांधकाम करण्याची परवानगी दिनांक २६/०६/२०१९ रोजी प्राप्त झाली. त्यामुळे ठाणे बाजुकडील बांधकाम व खाडीवरील १०० मी. विस्ताराचे काम सुरु करणेस उशीर झाला आहे.
- निविदा आराखड्यास मंजूर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डची परवानगी घेतली होती. तथापि, या दरम्यान जलमार्ग एन ५३ च्या प्रस्तावात सदर पुलाचे बांधकाम येत असल्यामुळे खाडीतील पुलाचे पिअर च्या जागेमध्ये बदल करण्यास सूचविल्यामुळे याठिकाणी नव्याने संकलन करावे लागले. सदर बदलास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डची परवानगी दिनांक १४/०४/२०१८ रोजी प्राप्त झाल्यावर काम सुरु करण्यात आले.
- सदर पुलाचे बांधकाम वाहतूक क्षेत्रात असल्याने वाहतुकीच्या नियोजनच्या दृष्टीने वाहतूक पोलीस विभागामार्फत टप्प्या टप्प्याने काम करणेबाबत परवानगी प्राप्त झाल्यामुळे पुलाच्या सर्व प्रस्तावित भागामध्ये एकाचवेळी काम करणे शक्य झाले नाही.
- माहे मार्च, २०२० पासून सुरु झालेल्या कोव्हिड-१९ साथीमुळे तसेच मजुरांची अनुउपलब्धता यामुळे काम पूर्ण करण्यास विलंब झाला आहे.

उपरोक्त नमुद बाबींमुळे काम पूर्ण करण्यास विलंब झाल्याने कामाकरीता वेळोवेळी ठाणे महानगरपालिकेने मुदतवाढ घेतली असून याकामी माहे सप्टेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ झालेली आहे.

तथापि, याकामी आणखी मुदतवाढीची आवश्यकता भासल्यास याबाबत कार्यवाही करण्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच सदर पुलाचे संपूर्ण काम आगामी सहा महिन्यांमध्ये डिसेंबर, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महापालिकेमार्फत मुंब्रा-कौसा येथे उभारण्यात येणाऱ्या रुग्णालयाच्या बांधकामाबाबत

**(३१) ९४१५ (१५-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिकेने मुंब्रा-कौसा येथे सन २००८ पासून हॉस्पिटल उभारण्याचे काम सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हॉस्पिटलच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच उक्त हॉस्पिटलसाठी शासनाने व महापालिकेने संयुक्तपणे खर्च केला आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतच्या खर्चाचा सविस्तर तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ठाणे महापालिकेने मुंब्रा-कौसा येथे हॉस्पिटल उभारण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली असल्याचे कळविले आहे:-

- कौसा येथे आरक्षित जागेवर ५० खाटांचे हॉस्पिटल बांधकाम करण्यासाठी अंदाजित रक्कम रुपये १० कोटीला महासभेने सन २००८ मध्ये मान्यता दिली आहे.
- तद्नंतर रुग्णालय उभारणीकरीता बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर सन २००९ मध्ये महासभेची मान्यता प्राप्त झाली होती.
- तद्नंतर महासभेने १०० खाटांचे रुग्णालय बांधण्याच्या कामास दिनांक १६/०७/२०13 अन्वये मंजुरी दिली होती.
- त्यानंतर रुग्णालयाचे आराखडे तयार करणे व निविदा मागविण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात रुग्णालय उभारण्याचे काम सन २०१४ पासून सुरू करण्यात आले.

(२) सदर हॉस्पिटलचे बांधकाम पूर्ण झाले असून हॉस्पिटल कार्यान्वित करण्यासाठी अनुषांगिक / पुरक कामे सुरू आहेत.

तसेच सदर हॉस्पिटलसाठी शासनाने व महापालिकेने संयुक्तपणे केलेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| नगरविकास विभाग | ४.० कोटी |
| ठाणे महानगरपालिका निधी | ११८.४७ कोटी |

उपरोक्त वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात डॉक्टर असलेले शेकडो वैद्यकीय विद्यार्थी कोरोना रुग्णसेवेमुळे अनुभवाच्या विविधतेपासून वंचित राहिल्याबाबत

**(३२) ९४२२ (१०-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.निलय नाईक, श्री.प्रशांत परिचारक, श्री.सदाशिव खोत, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत वर्षभर डॉक्टर असलेले शेकडो वैद्यकीय विद्यार्थी केवळ कोरोना रुग्णसेवा देत असल्याने त्यांना इतर वेगवेगळ्या विभागात रुग्णसेवेसाठी नियुक्त न केल्याने ते अनुभवाच्या विविधतेपासून वंचित राहिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिकित्सेच्या इतर शाखांमध्ये प्राविण्य मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांवर याचा परिणाम होणार असल्याने डॉक्टर म्हणून पदवी घेतल्यावर प्रत्यक्षात काम करण्याची वेळ येईल तेव्हा काय करायचे असा प्रश्न विद्यार्थ्यांसमोर निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व भावी डॉक्टर विद्यार्थ्यांना इतर आरोग्याचा अनुभव मिळावा यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०६-०९-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ५८ वरून ६० वर्षापर्यंत करण्याबाबत

**(३३) ९४२७ (१८-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या आरोग्य विभागातील गट-अ व गट-ब वैद्यकीय अधिकाऱ्यांची वयोमर्यादा ६० वर्षांपर्यंत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे निवृत्तीचे वय ५८ असूनही ठाणे महानगरपालिकेतील काही वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ६० वर्षापर्यंत त्यांची सेवा बजावली आहे, मात्र, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष निश्चित करून त्यांना आर्थिक लाभ प्रदान करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेतील वैद्यकीय अधिकाऱ्यांची वयोमर्यादा ५८ वरून ६० वर्षापर्यंत करावी अशी मागणी महानगरपालिकेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबत शासनाची भूमिका काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-१०-२०२१) :** (१), (२), (३) व (४) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्यसेवा गट-अ, महाराष्ट्र वैद्यकीय विमासेवा गट-अ यांचे वैद्यकीय अधिकारी, जिल्हाशल्य

चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ संवर्गातील पदे व इतर वरिष्ठ पदांवर कार्यरत अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षापर्यंत वाढविण्याचा शासन निर्णय दिनांक ०३/०९/२००५ व दिनांक २९/०८/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेच्या आस्थापनेवरील सेवानिवृत्त झालेले ७ वैद्यकीय अधिकारी तसेच सेवा बजावत असलेल्या ५ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० करण्याचा निर्णय ठाणे महानगरपालिकेने परस्पर घेतला होता.ठाणे महानगरपालिकेचा उपरोक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियमाकुल करण्याचा प्रस्ताव शासनास सन २०१९ मध्ये प्राप्त झाल्याची वस्तुस्थिती आहे.

तथापि, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय प्राप्त करण्यात आले होते. तद्नुषंगाने महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना त्यांचे वय ५८ वर्षे ग्राह्य धरुन निवृत्ती वेतन लागू करण्यात आल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षापर्यंत करणेबाबतच्या नगरविकास विभागाच्या प्रस्तावावर वित्त विभागाने खाते निहाय निर्णय घेणे उचित नाही. संपूर्ण शासनाचे कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुनच निर्णय घेण्यात यावा असे निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तिलारी धरण (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) परिसरात हजारो झाडांची विनापरवाना वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(३४) ९५७६ (२२-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक २९३९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिलारी धरण (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) ह्या महाराष्ट्र-गोवा राज्यांच्या संयुक्त प्रकल्प असलेल्या परिसरात शासनाने संपादित केलेल्या शेकडो एकर जमिनीवरील तसेच रिंग रोड व आतल्या ठिकाणी अनेकांनी अतिक्रमण करण्याकरीता हजारो झाडे तोडून बेकायदा विक्री केल्याप्रकरणी वन विभागाने संबंधिताविरोधात गुन्हा दाखल करून त्याबाबतचा संपूर्ण अहवाल जलसंपदा विभागाकडे संपूर्द करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवाल जलसंपदा विभागाला प्राप्त झालेला असूनही जलसंपदा विभागाच्या अखत्यारित असलेल्या शेकडो एकर जमिनीवरील हजारो झाडांची विनापरवाना वृक्षतोड होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आजमितीस उक्त वृक्षतोड माफियाविरोधात कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त जलसंपदा विभागाच्या अखत्यारित असलेल्या जमिनीवरील बेकायदा वृक्षतोड करणाऱ्याविरोधात जाणीवपूर्वक कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच वृक्षतोड माफियाविरोधात कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (११-१०-२०२१) :** (१) व (२) तिलारी धरण प्रकल्पाच्या संपादीत जमिनीवर विनापरवाना झालेल्या वृक्षतोडबाबत तोड करणाऱ्या आरोपींविरुध्द महाराष्ट्र वृक्षतोड (अधिनियम), १९६४ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. अवैध वृक्षतोडीबाबत संबंधित यंत्रणेला वेळोवेळी कळविण्यात आले आहे.
(३) तिलारी धरण प्रकल्प क्षेत्राच्या जमिनीवर विनापरवाना झालेल्या वृक्षतोड प्रकरणी वृक्षतोड करणाऱ्या सात आरोपींविरुध्द वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, दोडामार्ग यांच्याकडून महाराष्ट्र वृक्षतोड (अधिनियम), १९६४ नुसार दंडनीय कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) तिलारी धरण प्रकल्प क्षेत्राच्या जमिनीवर विनापरवाना वृक्षतोड करणाऱ्या आरोपींविरुध्द वृक्ष अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, दोडामार्ग यांनी महाराष्ट्र वृक्षतोड (अधिनियम), १९६४ नुसार दंडनीय कार्यवाही केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महानगरपालिकेतील ट्रॅफिक वार्डन्सचे थकीत मासिक वेतन अदा करण्याबाबत

**(३५) ९५८३ (१८-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेंतर्गत माहे ऑक्टोबर, २०१९ ते जुलै, २०२० या कालावधीत कार्यरत असलेल्या ९० ट्रॅफिक वार्डना आजमितीस मासिक वेतन मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित मासिक वेतन मिळावे म्हणून संबंधित ट्रॅफिक वार्डनी वारंवार शासनाकडे मागणी केलेली असतानाही शासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्यामुळे उक्त ट्रॅफिक वार्डनी आपली तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीकडे मांडले असता त्यांनी ठाणे महानगरपालिका आयुक्त यांची भेट घेऊन कोरोना काळात जीवावर उदार होऊन काम करणाऱ्या या कर्मचाऱ्याचे कौतुक करण्याऐवजी कर्मचाऱ्यांचे वेतन रोखून त्यांच्याकडूनच कमिशन घेणे ही बाब अत्यंत निदंनीय असल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मासिक वेतन अदा करण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याबाबत तसेच ट्रॅफिक वार्डना थकीत वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेकडे पोलीस वाहतूक विभागामार्फत केलेल्या मागणीनुसार ट्रॅफिक वॉर्डनच्या मानधनाची रक्कम पोलीस वाहतूक विभागास महापालिकेकडून वर्ग करण्यात येते व पोलीस वाहतूक विभागाकडून ट्रॅफिक वॉर्डन यांस अदा करण्यात येते.

त्यानुसार दिनांक १६/१०/२०१९ ते दिनांक ३१/०७/२०२० या कालावधीचे ट्रॅफिक वॉर्डन्सचे मानधनाची रक्कम रुपये ३८,५६,९०७/- वर्ग करण्यास वाहतूक विभाग, ठाणे शहर यांनी ठाणे महानगरपालिकेस कळविले होते.

तद्नुषंगाने आर्थिक तरतुद उपलब्ध करुन घेणे, लेखा तपासणी, सुरक्षा विभागाचे अभिप्राय घेणे इत्यादी कार्यालयीन प्रक्रिया पार पाडून सदरची रुक्कम वर्ग करण्याचा प्रस्ताव दिनांक २९/०४/२०२१ रोजी स्थायी समितीकडे वित्तीय मान्यतेसाठी सादर करण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान ट्रॅफिक वॉर्डनचे प्रलंबित वेतनाच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधीमार्फत ठाणे महानगरपालिकेस तक्रार प्राप्त झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, स्थायी समितीची वित्तीय मान्यता घेऊन, देयकाची कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दिनांक १०/०६/२०२१ रोजी रुपये ३८,५६,९०७/- एवढी रक्कम रक्कम सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर यांचे नावे वर्ग करण्यात आली आहे, असे ठाणे महानगरपालिकने कळविले आहे

तसेच भविष्यात ट्रफिक वॉर्डनचे मानधन विहित कार्यपध्दतीने व वेळेत नियमितपणे अदा करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व दक्षता घेण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौ.सावरशेत (ता.शहापूर, जि.ठाणे) गावातील कुटुंबाचे भातसा धरण परिसरात पुनर्वसन करण्याबाबत

**(३६) ९५८७ (१७-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.सावरशेत (ता.शहापूर, जि.ठाणे) भातसा धरण परिसरात सन २०१९ मध्ये राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे धरणातून पाण्याचा विसर्ग व्हावा या उद्देशाने धरणाचे पाचही दरवाजे उघडण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ.सावरशेत गावातील ३५२ लोकसंख्या असलेल्या ८३ कुटुंबाचा संपर्क १५ ते २० दिवस जिल्हा प्रशासनाशी तुटला असल्याचे त्यावेळी निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळयात भातसा धरणाचे पाचही दरवाजे उघडले जात असल्यामुळे दळणवळणासाठी असलेल्या एकमेव रस्त्यावरील चोरना नदीवरील पूल पाण्याखाली बुडत असून ३५२ लोकसंख्या असलेल्या सावरशेतमधील ८३ कुंटुंबियांनी भातसा वसाहतीत पुनर्वसन करण्याची मागणी माजी आमदार पांडुरंग बरोरा यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.नगरविकास मंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, जिल्हाधिकारी, ठाणे तसेच जलसंपदा विभागाचे संबंधित अधिकारी आदींकडे एका लेखी निवेदनाद्वारे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने दिलेल्या आदेशानुसार जलसंपदा विभागाने सादर केलेल्या अहवालात भातसा धरण परिसरात भूखंड शिल्लक नसल्याचे कळविण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मौ.सावरशेत वासियांची भातसा धरण परिसरात असलेली शेतीवाडीचा विचार करुन पुनर्वसन होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०६-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

भातसा धरणाच्या अधोबाजूस दोन्ही तिरांना जोडणारा सबमर्सिबल पुल धरणातून सोडलेल्या विसर्गामूळे पाण्याखाली गेल्याने ४ ते ५ दिवस सावरशेत ग्रामस्थांचा रहदारीचा मार्ग बंद झाला होता, तथापि, सदर ग्रामस्थांना आपत्कालीन सेवेसाठी धरण माथ्यावरुन येणारा डाव्या तीरावरील व उजव्या तीरावरील घाटरस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता.

(३) होय, अंशत: खरे आहे.

सदरहू निवेदन महामंडळाला प्राप्त झाले आहे.

(४) हे खरे नाही.

मौजे सावरशेत या गावातील कुटूंबाचे पुनर्वसन विशेष बाब म्हणून भातसा वसाहतीत करणेबाबत निर्णय योग्य स्तरावरुन होणेबाबतचा प्रस्ताव विभागीय कार्यालयामार्फत उप-जिल्हाधिकारी, पुनर्वसन शाखा, ठाणे यांना दिनांक १८/०१/२०२१ च्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर उपस्थित मुद्यांची शेरेपुर्तता करुन फेरप्रस्ताव विभागीय कार्यालयाचे दिनांक ०५/०५/२०२१ च्या पत्रान्वये उप-जिल्हाधिकारी, पुनर्वसन शाखा, ठाणे यांना सादर करण्यात आला आहे. सदर गावाचे पूर बाधित म्हणून पुनर्वसन करणे योग्य राहील.

(५) सदर गावाचे पूरबाधित म्हणून महसूल विभागामार्फत पुनर्वसन करणे उचित राहील.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे येथील वेदान्त खाजगी रुग्णालयातील अचानकपणे रुग्णांचे मृत्यू झाल्याबाबत

**(३७) ९६३० (२२-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील वर्तक नगरमधील वेदान्त या खाजगी रुग्णालयात दिनांक २६ एप्रिल, २०२१ रोजी ५ रुग्णांचा अल्पकालावधीत अचानकपणे मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी रुग्णांच्या नातेवाईकांकडून करण्यात आलेल्या तक्रारीनुसार भिवंडी-निजामपूर महापालिकेचे आयुक्त श्री.पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली सहा जणांची समिती स्थापना करण्यात आल्याचे मा.पालकमंत्री, ठाणे यांनी रुग्णालयाची पाहणी केल्यानंतर जाहीर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीने रुग्णालयात झालेले मृत्यू, मृतांची नावे व वय, कोविड आजाराबाबत व रुग्णांची आरोग्य विषयक स्थिती, इतर आवश्यक माहिती, मृत्यूची कारणे व मृत्यूची वेळ, रुग्णांच्या मृत्यूचा ऑक्सिजन पुरवठ्याशी काही संबंध आहे काय याचा तपशील तसेच मृत्यू वैद्यकीय हलगर्जीपणाशी संबंधित आहे किंवा कसे इत्यादी बाबींसंदर्भात चौकशी समितीने आपला अहवाल शासनास तात्काळ सादर करावा असे निर्देशित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीने शासनास आपला अहवाल सादर केला आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषींविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१)** : (१) ठाणे येथील वर्तक नगर मधील वेदान्त या खाजगी रुग्णालयात दिनांक २६/०४/२०२१ रोजी सकाळी ०८.३० ते दुपारी ०४.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत विविध वेळी ५ कोविड पॉझिटिव्ह रुग्णांचा मृत्यू झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदरचे घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व साथरोग प्रतिबंधक अधिनियम, १८९७ नुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २६/०४/२०२१ च्या आदेशान्वये वेदान्त हॉस्पिटल, वर्तक नगर येथे झालेल्या रुग्णांच्या मृत्यूबाबत तात्काळ चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत डॉ.पंकज आशिया, आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची चौकशी समिती गठीत केली होती.

सदर समितीने दिनांक २६/०४/२०२१ रोजी वेदान्त रुग्णालयात झालेले एकूण मृत्यू, मृतांची कोविड-१९ आजाराबाबतची स्थिती रुग्णनिहाय मृत्यूची वेळ व कारणे, ऑक्सिजन पुरवठ्याची स्थिती, रुग्णालय व्यवस्थापनाचा हलगर्जीपणा व इतर विविध मुद्यांच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन दिनांक २७/०४/२०२१ रोजी अहवाल जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर केला आहे.

(४) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी वेदान्त रुग्णालय ठाणे येथे दिनांक २६/०४/२०२१ रोजी झालेल्या कोविड रुग्णांच्या मृत्यूबाबत चौकशी करण्याकरीता त्यांच्या स्तरावर गठीत केलेल्या चौकशी समितीचा अहवाल शासनास दिनांक २७/०४/२०२१ रोजी सादर केला आहे.

सदर चौकशी समितीच्या अहवालात नमूद केल्यानुसार सदर घटनेत ५ कोविड रुग्णांचा मृत्यू ऑक्सिजन अभावी झालेला नसून संबंधित रुग्णांवर कोविड प्रोटोकॉल नुसारच उपचार करण्यात आलेले आहेत. संबंधित रुग्णांचा मृत्यू हा न्यूमोनिया व मोठ्या प्रमाणातील कोविड संसर्गामुळे झालेला आहे. तसेच हॉस्पिटल व्यवस्थापनाकडून रुग्णांच्या नातेवाईकांना माहिती न देणे किंवा विलंबाने माहिती देणे रुग्णांच्या नोतवाईकांना रुग्णांची स्थिती काय आहे या विषयी माहिती न देणे हे मुद्दे रुग्णालय व्यवस्थापनाशी निगडीत आहे.

दरम्यान उपरोक्त अहवालातील निष्कर्ष लक्षात घेता भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी खबरदारी तसेच कोविड रुग्णालयातील ऑक्सिजन इत्यादी पुरवठ्याचे व्यवस्थित नियोजन करणेबाबत आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना दिनांक ०७/०५/२०२१ रोजी आदेशित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोनाळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायत हद्दीतील अरहम लॉजिस्टीक कॉम्प्लेक्स या इमारतीस आग लागल्याबात

**(३८) ९६७५ (१६-०६-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-नाशिक महामार्गावरील सोनाळे ग्रामपंचायत हद्दीतील (ता.भिवंडी, जि.ठाणे) अरहम लॉजिस्टीक कॉम्प्लेक्स येथील इमारतीमध्ये ईडीयू लाईट या संस्थेचे दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य केंद्र तसेच प्रशिक्षणार्थी वसतिगृह आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीत अचानक आग लागून इमारतीतील वसतिगृह असलेल्या दुसऱ्या मजल्यापर्यंत ती आग पोहोचल्यामुळे तेथील ७४ विद्यार्थ्यांना अग्निशम दलाच्या जवानांमार्फत बाहेर काढण्यात आले असल्याचे दिनांक २९ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आगीत जीवितहानी झाली नसली तरी तेथील प्रशिक्षाणार्थी विद्यार्थ्यांचे कपडे व इतर अत्यावश्यक साहित्य जळून खाक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आग लागण्याचे नेमके कारण काय, याबाबत भिंवडी पोलिसांमार्फत चौकशी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे व त्यानुसार पोलीस तपासात काय आढळून आले,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर आगीमुळे वसतिगृहातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या झालेल्या नुकसान भरपाईबाबत शासनाने वा संस्थेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) १७ विद्यार्थ्यांना अग्निशमन दलाच्या जवानांमार्फत बाहेर काढण्यात आले व उर्वरित ५७ विद्यार्थी पहिला मजला, तळमजला व गार्डन येथे होते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती. आगीमुळे वसतिगृहातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाच्या मुख्यालयातील होस्ट केलेली लोकल सर्व्हरवर सायनॅक (SYNCK) रॅन्समवेअर ही वेबसाईट हॅक झाल्याबाबत

**(३९) ९६७६ (०९-०६-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाच्या मुख्यालयातील होस्ट केलेल्या लोकल सर्व्हरवर सायनॅक (SYNCK) रॅन्समवेअर ह्या वेबसाईटवर दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास हॅकर्सने संगणकीकृत हल्ला केल्यामुळे महामंडळाचे सर्व संगणकीय कामकाज बंद पडले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सायबर हल्लेखोरांनी एमआयडीसीच्या मेल आयडीवर मेल करुन ५०० कोटी रुपयांची मागणी करुन ती रक्कम न दिल्यास महामंडळाच्या संगणकीकृत डेटा नष्ट करण्याची धमकी दिली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाने हॅकर्सने केलेल्या संगणकीकृत हल्ला व धमकी संदर्भात पोलिसांकडे गुन्हा नोंदविला आहे काय व केव्हा तसेच त्यानुसार पोलीस तपासामध्ये काय आढळून आले व त्यानुसार पोलिसांकडून याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) प्रशासकीय कामकाज पुढे चालू ठेवण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हल्लेखोरांनी खंडणीबाबतची नोंद (Note) बाधित सर्व्हरवर ठेवली होती. त्यामध्ये हल्याची माहिती आणि डेटा डिक्रीपशनसाठी त्यांचाकडे जाण्याच्या पर्यायांची माहिती दिली होती. तथापि, त्यात खंडणीच्या रकमेचा थेट उल्लेख करण्यात आलेला नव्हता.

(३) व (४) मुंबई सायबर पोलीस ठाणे येथे दिनांक ३१/०३/२०२१ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रस्तुत गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाने प्रशासकीय कामकाज पुढे चालू ठेवण्याच्या दृष्टीने तातडीने पावले उचलण्यात आली व encrypt झालेला डेटा बॅकअप फाईल्स मधून पुन्हा मिळविण्यात महामंडळाला यश आले. ज्यामार्फत महामंडळाद्वारे ऑन लाईन सेवा पुरविण्यात येतात अशा सर्व संगणकीय प्रणाल्या पुन्हा सुरू करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घागरवाडा (ता.धारूर, जि.बीड) येथील रस्त्याची व पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४०) ९७४६ (१७-०६-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घागरवाडा (ता.धारूर, जि.बीड) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून दोन वर्षापूर्वी त्या ठिकाणी असलेला पुलही अर्धवट स्थितीत वाहून गेला असून त्याचीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयापूर्वी सदर रस्ता व पुलाची दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थांकडून शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने घागरवाडा येथील रस्त्याची व पुलाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत रामा-२०९ ते आरणवाडी घागरवाडी ता.धारूर, जि.बीड या रस्त्याच्या कामास दिनांक ०१ जुलै, २०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असून सदर रस्त्याच्या अंदाजपत्रकात खडीकरण व डांबरीकरणाचे काम प्रस्तावित असून नाल्याच्या ठिकाणी १८ नळकांडी पुलाचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात परराज्यातून बेकायदा मद्य आणले जात असल्याबाबत

**(४१) ९७४८ (१५-०७-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात परराज्यातून मोठ्या प्रमाणात बेकायदा मद्य आणले जात असल्याचे निदर्शनास आले असून राज्य उत्पादन शुल्क विभागाने माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लाखो रुपयांचे मद्य जप्त केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१२-१०-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यात माहे डिसेंबर २०२० मध्ये अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पालघर आणि विभागीय भरारी पथक, ठाणे कार्यालय यांनी परराज्यातील अवैद्य मद्य तस्करीविरुध्द १० गुन्हे नोंदविले असून ११ आरोपींना अटक करुन एकूण रुपये ४०.३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.
सदर गुन्हे तपासाधीन आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील वाशी येथे महाराष्ट्र भवन उभारण्याबाबत

**(४२) ९७८० (१८-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत राज्याच्या उर्वरित भागातून (कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आदी) मोठ्या प्रमाणात कामासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी नवी मुंबईत महाराष्ट्र भवन उभारावे अशी मागणी लोकप्रतिनिधींसह या भागातील जनतेने अनेक वर्षांपासून शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने नवी मुंबईत विविध राज्यांना सांस्कृतिक भवन उभारण्यासाठी दिलेल्या भूखंडावर अनेक राज्यांनी आपले भवन उभारले असून नवी मुंबईत “महाराष्ट्र भवन” उभारण्यासाठी सिडकोने वाशी रेल्वे स्थानक परिसरात आठ हजार चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड आरक्षित ठेवलेला असतानाही सन १९९८ पासून या आरक्षित भूखंडावर “महाराष्ट्र भवन” निर्मितीच्यादृष्टीने कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे २२ वर्षांपासून महाराष्ट्र भवन बांधण्याचे काम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर आरक्षित भूखंडावर महाराष्ट्र भवन उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त कामाकरीता किती निधीची आवश्यकता असून ते कधीपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१०-२०२१)** : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.१२३१४, दिनांक ०३/०३/२०२० अन्वये वाशी सेक्टर ३०-अ येथील भूखंड क्र.११ ते १४ क्षेत्र अंदाजे ८३२२.९१ चौ.मी. सार्वजनकि बांधकाम विभागास महाराष्ट्र राज्य अतिथीगृह बांधणे व व्यवस्थापन यासाठी भाडेपट्टा कराराने देण्यास मान्यता

देण्यात आली आहे. त्यानुसार १२/११/२०२० रोजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागास इरादापत्र देऊन भूखंडाप्रित्यर्थ एकूण भाडेपट्टा रक्कमेच्या १०% अनामत रक्कम भरण्यास कळविण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत, सिडको व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ ठाणे यांचेमार्फ़त सन २०२१-२२ या वित्तीय वर्षासाठी सदर भूखंडांचे मूल्य ठरवणे व इतर बाबीं बाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याची ऑक्सिजनची गरज पूर्ण करण्यासाठी शासनाने हाती घेतलेल्या "मिशन ऑक्सिजन स्वावलंबन" योजनेबाबत

**(४३) ९८८६ (१७-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याची ऑक्सिजनची गरज पूर्ण करण्यासाठी शासनाने मिशन ऑक्सिजन स्वावलंबन ही योजना हाती घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत ऑक्सिजन निर्माण करणाऱ्या राज्यातील उद्योगांना विशेष प्रोत्साहन योजनेंतर्गत उद्योगधंद्यांना मोफत वीज, मुद्रांक शुल्क माफी, वस्तू व सेवा करात तसेच भूखंड दरात सवलत देण्याच्या निर्णयानुसार उद्योग विभागाने निर्णयात्मक कार्यवाही सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-१०-२०२१)** : (१) होय, हे खरे आहे. शासनाने मिशन ऑक्सिजन स्वावलंबन योजनेंर्गत विशेष प्रोत्साहन धोरण दिनांक २१ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केले आहे.

(२) व (३) ऑक्सिजन निर्मिती करणाऱ्या राज्यातील प्रस्तावित नवीन तसेच विस्तारीकरण उद्योगांनी विशेष प्रोत्साहने मिळण्यासाठी दिनांक ३०/०६/२०२१ पुर्वी अंमलबजावणी यंत्रणांकडे विहित नमुन्यात अर्ज करावयाचे होते. पात्रतेचे निकष पूर्ण करीत असलेल्या घटकांना मुद्रांक शुल्क माफी, वस्तु व सेवा कर, भूखंड दर सवलत तसेच वीज दर परतावा इत्यादी प्रोत्साहनपर सवलती देण्यात येणार आहेत. सदर घटकांच्या प्रस्तावांची छाननी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) विकास आयुक्त (उद्योग) यांचे स्तरावरुन सदर योजनेची मार्गदर्शक तत्वे दिनांक ०९/०६/२०२१ निर्गमित करण्यात आलेली आहेत. त्यानुषंगाने प्रस्तुत योजनेंतर्गत अर्ज विहित मुदतीत प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही झाली आहे. सध्या राज्यात नवीन तसेच विस्तारीकरणांतर्गत साधारणत: ५४ प्रकल्प व त्याव्दारे ९०० मे.टन ऑक्सिजन निर्मिती प्रस्तावित असून, त्यातील काही घटकांना एमआयडीसी व एमआयडीसी क्षेत्राबाहेर जमिनी उपलब्ध करुन आवश्यक मशिनरीच्या ऑर्डर दिलेल्या आहेत. सदर घटक उत्पादनात गेल्यानंतर उपरोक्त प्रोत्साहने मिळण्यासाठी पात्र असतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंगी (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील जायकवाडी उजवा कालवा वितरीका क्रमांक पाच बेकायदेशीर जेसीबीच्या सहाय्याने चारी व चारीचा रस्ता बुजवून शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत

**(४४) ९८९२ (१५-०७-२०२१) श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंगी (ता.शेवगाव, जि.अहमदनगर) येथील गट नंबर ४१२/४१३ मधील जायकवाडी उजवा कालवा वितरिका क्रमांक पाच बेकायदेशीर जेसीबीच्या सहाय्याने चारी व चारीचा रस्ता बुजवून शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याची शासनाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चारी (वितरिका) व चारीवरील रस्ता बंद केल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी जाता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्याचा शेतीकडे जाण्याचा रस्ता अडवून त्या ठिकाणी उसाची लागवड केली असल्याने संबंधित शेतकऱ्याचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरील अन्यायग्रस्त कुटुंबाला संरक्षण देऊन त्याचा रस्ता खुला करून देण्यासाठी व शासकीय मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०५-१०-२०२१) :** (१) होय, संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही, वितरिकेपासून तक्रारदाराच्या शेतामध्ये इतर खाजगी जमीन असल्याने वितरिका ते तक्रारदार यांचे शेताकडे जाण्याकरीता अपेक्षित पोहोच रस्त्याची बाब जलसंपदा विभागाशी संबंधित नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वैद्‌यकीय परीक्षा सुरक्षित वातावरणात घेण्याबाबत

**(४५) ९९०० (१५-०७-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना प्रादुर्भावाची स्थिती गंभीर असली तरी सुरक्षित वातावरणात दिनांक १० जून, २०२१ रोजीपासून वैद्‌यकीय परीक्षा घेण्याचा निर्णय मा.वैद्‌यकीय शिक्षण मंत्री यांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परीक्षा सुरक्षितपणे व्हाव्यात यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व त्यानुषंगाने राज्य शासनाच्या निर्णयात्मक कार्यवाहीची सद्‌यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (०६-०९-२०२१) :** (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक प्रशासनाशी विविध बैठकांद्वारे चर्चा करुन विद्यापीठाच्या परीक्षा सुरक्षित वातावरणात घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

(२) अ) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी परीक्षा सुरक्षित वातावरणात घेण्यासाठी मानक कार्यप्रणाली तयार केली आहे. त्या मानक कार्यप्रणालीच्या धर्तीवर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने मानक कार्यप्रणाली तयार करुन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे. सदर मानक कार्यप्रणालीनुसार परीक्षा घेण्यात आलेल्या आहेत.

ब) परीक्षा केंद्रावर निर्जंतुकीकरण व सोडीयम हायपोक्लोराईड सोल्युशन यासाठी विद्यापीठामार्फत प्रत्येक परीक्षा केंद्रासाठी रुपये २०,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

क) विद्यापीठातर्फे विद्यार्थी/परीक्षार्थी यांचेसाठी कोरोना सुरक्षा कवच योजना एक वर्षापूर्वी लागू करण्यात आलेली आहे.

ड) ज्या विद्यार्थ्यांना कोरोना आजारामुळे प्रात्यक्षिक परीक्षा देता आल्या नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या विलगीकरण कालावधीनंतर त्याच प्रात्यक्षिक परीक्षा केंद्रावर स्वतंत्र प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

इ) कोविड-१९ आजाराचा अहवाल सकारात्मक आल्यामुळे जे विद्यार्थी हिवाळी-२०२० लेखी परीक्षेस अनुपस्थित आहेत, अशा विद्यार्थ्यांची विद्यापीठामार्फत विशेष परीक्षा घेण्यात येईल. तसेच, सदर परीक्षेसाठी अनुपस्थित असलेल्यांचा Attempt ग्राह्य धरला जाणार नाही.

फ) विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेचा पेपर लिहिताना कोरोनाचा संसर्ग होऊ नये या उद्देशाने मा.न्यायालयाच्या आदेशान्वये परीक्षेसाठी दिनांक १०/०६/२०२१ पर्यंत विद्यार्थ्यांने Rapid Antigen Test Report/RTPCR Test Report आणणे बंधनकारक केले होते व दिनांक १६/०६/२०२१ पासून लेखी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी RTPCR Test Report आणणे बंधनकारक केले होते. विद्यार्थ्यांचा अहवाल नकारात्मक असल्यानंतरच त्यांना परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात आलेला आहे.

ग) शासकीय रुग्णालय/शासन मान्य कोविड आजाराचे रुग्णालय या ठिकाणी परीक्षार्थ्यांच्या Rapid Antigen Test Report/RTPCR Test Report ची विनामूल्य सोय करण्यात आली होती.

(३) लागू नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या ३२ शाळांचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४६) ९९२२ (१७-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका प्रशासनाने ३२ शाळांसाठी ४९८ कोटी रुपयांच्या कामांना सन २०१८ मध्ये मंजुरी देऊनही अद्यापपर्यंत सदर शाळांची कामे पूर्ण झाली नसल्याचे माहितीच्या अधिकारामार्फत देण्यात आलेल्या माहितीतून माहे एप्रिल, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ३२ शाळांची कामे अपूर्णावस्थेत असल्याने विद्यार्थ्यांना अनेक सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कोट्यवधीच्या निधीस मान्यता देऊनही ३२ शाळांची कामे वेळेत पूर्ण न झाल्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत कोविड-१९ रोगाच्या महामारीमुळे शालेय शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण देण्यात येत आहे.

(३) सन २०२० मध्ये अकल्पितपणे उद्भवलेल्या कोविड-१९ रोगाच्या महामारीमुळे जगभरातील सर्व व्यवहार ठप्प झाले होते. याचाच परिणाम शालेय इमारतींच्या कामांच्या प्रगतीवर देखील झाला.

कोविड-१९ रोगाच्या महामारीमुळे मुंबई बाहेरुन मुंबईत येणारे कामगार त्यांचे गावी मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत झाल्याने सदर कामांकरीता आवश्यक त्या प्रमाणात कामगार उपलब्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे कामाची गती मंदावलेली होती.

याबाबत शासनाने पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १०/०८/२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार शाळा पायाभूत सुविधा कक्ष या विभागामार्फत सुरु असलेल्या कामांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

कोविड कालावधीतील अनुज्ञेय मुदतवाढ व प्रकल्पातील इतर अडचणींमुळे देय असलेली मुदतवाढ याकरीता प्रकल्पनिहाय स्वतंत्र मंजुरी घेण्यात आली आहे.

सदर महामारीमुळे अद्यापी कामाचा वेग वाढविणे शक्य झालेले नाही. तथापि, प्रस्तावित सर्व कामांची प्रगती सद्य:स्थितीत समाधानकारक असून तीन कामे पूर्ण झाली आहेत व बहुतांश कामे पूर्णत्वाच्या टप्प्यावर असून, सदर कामे वाढीव मुदतीत पूर्ण करुन घेण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## राज्यात २५१५ या लेखाशीर्षकांतर्गत ग्रामपंचायत कामासाठी देण्यात येणाऱ्या निधीच्या शासन निर्णयाबाबत

**(४७) १००२९ (१५-०७-२०२१) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २५१५ या लेखाशीर्षकांतर्गत ग्रामपंचायत कामासाठी देण्यात येणाऱ्या निधीचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर अपलोड करण्यात येत नसल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास विभागाच्या २५१५ लेखाशीर्षकांतर्गत विधानसभा व विधानपरिषद सदस्यांना किती निधी वितरित करण्यात येतो तसेच दोन्ही सभागृहातील सदस्यांना किमान निधी देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, शासनाच्या सर्व विभागाच्या खर्चाच्या तरतूदीचे शासन निर्णय अपलोड करण्यात येत असून ग्रामविकास विभागातील २५१५ या अंतर्गत देण्यात येणाऱ्या निधीचे शासन निर्णय अपलोड न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच, शासनाचा कारभार पारदर्शक होत असतानाही ग्रामविकास विभागास कोणती विशेष सवलत दिली आहे,

(४) असल्यास, सदर शासन निर्णय शासनाच्या अधिकृत वेब साईटवर टाकण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०१-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर योजनेंतर्गत शासनाच्या मान्यतेने निधी उपलब्धतेनुसार दोन्ही सभागृहातील सदस्यांना निधी मंजूर करण्यात येतो.

(३), (४) व (५) २५१५ लेखाशीर्षाखाली ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधींना जिल्हानिहाय कामे मंजूर होतात. सदर कामे मंजूर झाल्यानंतर संबंधित लोकप्रतिनिधींकडून सदर कामांची यंत्रणा बदल व काम बदल करण्याच्या

शिफारशी शासनास प्राप्त होतात. सदर काम बदल अन्य योजनेतून कामे होणे, जागा उपलब्ध न होणे इ. कारणामुळे होत असतात. त्यामुळे मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये बदल होत असल्याने सुधारित काम बदलाचे आदेशही निर्गमित होतात. सबब, मर्यादित मनुष्यबळाअभावी मूळ आदेश व काम बदल व यंत्रणा बदल आदेश मोठ्या प्रमाणावर होत असल्याने शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर अपलोड करणे शक्य होत नाही.

---

## राष्ट्रीय पर्यावरणीय अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (नीरी) ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरीता केलेल्या शिफारशींबाबत

**(४८) ४८१५६ (०५-०७-२०१९) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील २७ शहरातील ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याकरीता राष्ट्रीय पर्यावरणीय अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (नीरी) आपला अहवाल सादर केला असून सदर अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे आदेश पालिकांना द्यावेत असे निर्देश दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.उच्च न्यायालयाने राज्य शासनास दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय पर्यावरणीय अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (नीरी) सादर केलेल्या अहवालातील शिफारशी थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत - न्यायालये, रूग्णालये, शैक्षणिक संस्था इत्यादींच्या सभोवताली शांतता क्षेत्र जाहीर करणे, ध्वनी प्रदूषणामुळे होणाऱ्या परिणामांबद्दल प्रसारमाध्यमांद्वारे जनजागृती करणे, वाहनांचे हॉर्न, सार्वजनिक कार्यक्रमातील फटाके व म्युझिक सिस्टीम

इत्यादीवर नियंत्रण आणणे त्याचप्रमाणे महानगरपालिकांनी त्यांच्या शहरांचा विकास आराखडा तयार करतेवेळीच ध्वनी प्रदूषणाचे झोनची आखणी करणे इत्यादी.
(३) राष्ट्रीय पर्यावरणीय अभियांत्रिकी संशोधन संस्थेचा (नीरी) अहवाल सर्व महानगरपालिकांना आवश्यक त्या कार्यवाहीकरीता पाठविण्यात आला असून महानगरपालिका स्तरावर शहर ध्वनी प्रदूषण नियंत्रण समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील माहिम खाडीतील पाणी जलचरांसाठी धोकादायक असल्याबाबत

**(४९) ४९०१९ (०५-०७-२०१९) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील माहिम खाडीतील पाणी दूषित झाले असून ते जलचरांसाठी धोकादायक बनल्याचा अहवाल इंडिया कॉन्सल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च ऑफ फिशरीज एज्युकेशन, मुंबई या संस्थेने नुकताच दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अहवालात कोणकोणत्या बाबी नमूद केल्या आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (१२-१०-२०२१) :** (१) इंडियन कॉन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च-सेंट्रल इन्स्टीट्युट ऑफ फिशरीज एज्युकेशन, मुंबई यांनी Study of Deterioration Level of Water Quality along Mahim Creek of Mumbai या विषयाबाबतचा शोध निंबध इंडियन जर्नल ऑफ इकोलॉजी यामध्ये २०१८ मध्ये प्रकाशित केला आहे.

(२) उपरोक्त शोध निबंधामध्ये खालील बाबी नमुद करण्यात आलेल्या आहेतः

- माहिम खाडीतील पाण्यामध्ये डी.ओ., बी.ओ.डी. आणि फ़िकल कालिफ़ार्मचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आलेले आहे.
- महानगरपालिका हद्दीतून निर्गमित होणारे मुख्यत्वे झोपडपट्टी भागातुन मिसळणाऱ्या विनाप्रक्रिया सांडपाण्यामुळे फ़िकल कालिफ़ार्मचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे.
- खाडी किनारी होणाऱ्या अनाधिकृत अतिक्रमणे, बांधकामे व डंपिग इत्यादीवर निर्बंध आणुन कांदळवणे लागवडीवर भर देण्याबाबत सुचना करण्यात आलेल्या आहेत.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतून निर्गमित होणाऱ्या घरगुती पाण्याचे संकलन करुन प्रक्रिया करणेबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळाकडून महानगरपालिकेस वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. त्याचबरोबर, बृहन्मुंबई महानगरपालिका कडून मिठी नदीत येणारा बिन पावसाळी प्रवाह अडवून त्यावर प्रक्रिया करण्याची कृती आराखडा तयार केला असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. तसेच कांदळवन कक्ष मुंबई यांच्याकडून कांदळवन संवर्धन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठात 'इनोव्हेशन अ‍ॅण्ड इन्क्युबेशन सेंटर' कार्यान्वित करण्याबाबत

**(५०) ४९३४१ (२९-०८-२०१९) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी 'स्टार्ट अप इंडिया' या केंद्र शासनाच्या उपक्रमांतर्गत राज्यात प्रोत्साहन देण्यासाठी १६ ठिकाणी इन्क्युबेशन सेंटर सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीकडून प्रत्येक केंद्राला पाच कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून मुंबई विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांपैकी कल्पक विद्यार्थ्यांना स्टार्ट अप सुरू करणे सोपे व्हावे या उद्देशाने मुंबई विद्यापीठातील ग्रीन टेक्नॉलॉजी केंद्रात 'इनोव्हेशन ॲण्ड इन्क्युबेशन सेंटर' चे उद्घाटन होऊन सहा महिने होवूनही केंद्राचे प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार मुंबई विद्यापीठात सदरहू केंद्र कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील विद्यर्थ्यांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी "स्टार्ट अप इंडिया" या केंद्र शासनाच्या उपक्रमांतर्गत राज्यात प्रोत्साहन देण्यासाठी दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन आदेशान्वये १६ ठिकाणी इनक्यूबेशन सेंटर सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.

दिनांक १३ जून, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक इनक्यूबेटर्सना ५ वर्षाच्या कालावधीमध्ये रुपये ५ कोटी इतके अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी रुपये २५.०० लक्ष इतका निधी या इनक्यूबेटरला वितरीत करण्यात आला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या "MU IDEAS Foundation" या स्टार्टअप इन्क्यूबेशन सेंटरद्वारे नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देऊन स्टार्टअप संस्कृती स्थापन करण्यास सुरवात केली आहे. या केंद्रामार्फत उद्योजक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी कृतिशील कार्यक्रम, कायदेशीर बाबी, बौध्दीक संपदा अधिकार, पेटंट संबंधित उध्दवणाऱ्या समस्या, व्यवसाय मॉडेल निर्मिती तसेच आर्थिक बाबीसंबंधीचे मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण आणि जागरुकता कार्यक्रम राबविण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.